Epaper
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे
। शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर २०२६ । वर्ष १ ।अंक १४७ ।पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION

श्रीकृष्ण जन्माष्टमी
सर्व वाचकांना हार्दिक शुभेच्छा!

Selected

## अमरावतीत भररस्त्यात अल्पवयीन महाविद्यालयीन तरुणीचा खून

**अमरावती | प्रतिनिधी:** शहरातील रवीनगर चौक परिसरात गुरुवारी सकाळी एका अल्पवयीन महाविद्यालयीन तरुणीवर चाकूने प्राणघातक हल्ला करून तिची हत्या करण्यात आल्याची धक्कादायक घटना घडली. भररस्त्यात घडलेल्या या घटनेमुळे अमरावती शहरात खळबळ उडाली आहे. हल्ल्यानंतर संशयित घटनास्थळावरून पसार झाला असून, त्याच्या अटकेसाठी पोलिसांनी विविध तपास पथके नियुक्त केली आहेत. मृत तरुणी एका महाविद्यालयात बीएस्सी प्रथम वर्षाचे शिक्षण घेत होती. गुरुवारी सकाळी ती नेहमीप्रमाणे दुचाकीवरून महाविद्यालयाकडे जात होती. रवीनगर चौकातील नाल्याच्या काठाजवळ संशयित युवकाने तिची दुचाकी अडवली. काही वेळ दोघांमध्ये संवाद झाल्यानंतर अचानक वाद आणि झटापट सुरू झाली. त्यानंतर संशयिताने चाकूने तिच्यावर हल्ला केला. पोलिसांच्या प्राथमिक माहितीनुसार, संशयिताने तरुणीच्या गळ्यावर चाकूने वार केला.

### "11 सप्टेंबरपर्यंत अंमलबजावणी करा, अन्यथा 12 सप्टेंबरला मुंबईत आंदोलन"

# मंत्री म्हणाले, "सगळ्या मागण्या मान्य"; जरांगे मात्र उपोषणावर ठाम!

## "यापुढे उपोषण केले तर मरून जाईन"; मनोज जरांगेंचा इशारा

जन सम्राट टाईम्स

**जालना | प्रतिनिधी:** : मराठा समाजाच्या विविध मागण्यांसाठी अंतरवाली सराटी येथे सुरू असलेले मनोज जरांगे यांचे उपोषण सोडवण्यासाठी राज्य सरकारच्या मंत्र्यांचे शिष्टमंडळ गुरुवारी दाखल झाले. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, उदय सामंत, मकरंद पाटील आणि आमदार प्रसाद लाड यांनी जरांगे यांच्याशी चर्चा करून त्यांच्या मागण्यांवर सरकार सकारात्मक असल्याचे सांगितले. मात्र, सरकारने मागण्या मान्य केल्याचे आश्वासन दिल्यानंतरही जरांगे यांनी उपोषण मागे घेण्यास नकार दिला आहे. मागण्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाल्यानंतरच उपोषण सोडणार असल्याची भूमिका त्यांनी स्पष्ट केली.

मागील सहा दिवसांपासून जरांगे अंतरवाली सराटी येथे उपोषणाला बसले आहेत. मराठा समाजाच्या आरक्षणासह विविध मागण्यांवर तोडगा काढण्यासाठी सरकारकडून प्रयत्न सुरू आहेत. याच पार्श्वभूमीवर मंत्र्यांचे शिष्टमंडळ अंतरवाली सराटीत पोहोचले. यावेळी झालेल्या चर्चेत सरकारकडून मागण्यांवर कार्यवाही करण्याचे आश्वासन देण्यात आले.



### 58 लाख कुणबी नोंदींवर प्रमाणपत्राची प्रक्रिया

मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले की, न्यायमूर्ती शिंदे समितीच्या माध्यमातून मराठा समाजाशी संबंधित 58 लाख कुणबी नोंदी सापडल्या आहेत. या नोंदींच्या आधारे पात्र व्यक्तींना जात प्रमाणपत्र मिळवून देण्याची प्रक्रिया सुरू करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. 4 सप्टेंबरपासून नोंदी उपलब्ध असलेल्या नागरिकांनी जात प्रमाणपत्रासाठी अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. प्रमाणपत्र मिळवताना कोणत्याही प्रकारच्या अडचणी आल्यास संबंधित जिल्हाधिकाऱ्यांशी संपर्क साधण्याचे आवाहनही विखे पाटील यांनी केले. प्रत्येक जिल्ह्यात यासाठी नोडल अधिकारी नियुक्त करण्यात येणार असून मंत्रालयात स्वतंत्र मराठा आरक्षण कक्ष तयार केला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

### "11 सप्टेंबरपर्यंत वेळ देतो"

सरकारच्या आश्वासनानंतरही मनोज जरांगे आपल्या भूमिकेवर ठाम राहिले. "हे माझे शेवटचे उपोषण आहे. यापुढे शरीर साथ देणार नाही. पुन्हा उपोषण केले तर मरून जाईन," असे त्यांनी म्हटले. त्यामुळे याच वेळी मराठा समाजाच्या सर्व मागण्या मान्य करून घेणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मंत्र्यांच्या शब्दाला मान देत आपण उपचारासाठी एकाऐवजी दोन सलाईन लावून घेण्यास तयार असल्याचेही जरांगे यांनी सांगितले. मात्र, केवळ आश्वासन नको, तर मागण्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी झाली पाहिजे, अशी त्यांची भूमिका आहे. जरांगे यांनी सरकारला 11 सप्टेंबरपर्यंतची मुदत दिली आहे. या कालावधीत मागण्यांची अंमलबजावणी न झाल्यास 12 सप्टेंबर रोजी मुंबईत जाऊन आंदोलन करण्याचा इशारा त्यांनी दिला आहे. त्यामुळे सरकारसमोर आता आश्वासनांची अंमलबजावणी करण्याचे आव्हान निर्माण झाले आहे.

### सरकारकडून चर्चेचा मार्ग

दरम्यान, मंत्र्यांनी जरांगे यांनी उपोषण मागे घ्यावे, अशी वारंवार विनंती केली. मराठा समाजाच्या मागण्यांवर सरकारकडून सकारात्मक कार्यवाही सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मराठा आरक्षणाचा प्रश्न न्यायालयीन आणि प्रशासकीय प्रक्रियेशी संबंधित असल्याने सरकारकडून टप्प्याटप्प्याने कार्यवाही केली जात असल्याचे सांगण्यात आले.

विखे पाटील यांनी यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या कार्यपद्धतीचे कौतुक केले. मराठा समाजाच्या मागण्यांवर आतापर्यंत झालेल्या कार्यवाहीचा संदर्भ देत त्यांनी सरकारकडून प्रश्न सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे नमूद केले. मात्र, सरकारच्या आश्वासनांपेक्षा प्रत्यक्ष अंमलबजावणीला प्राधान्य असल्याचे जरांगे यांनी स्पष्ट केल्याने अंतरवाली सराटीतील आंदोलन तूर्त कायम आहे. आता 11 सप्टेंबरपर्यंत सरकार कोणती पावले उचलते आणि त्यानंतर जरांगे आपले आंदोलन मागे घेतात की मुंबईकडे कूच करतात, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे.

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या आंदोलनाला 'सीजेपी'चे बळ

## मंत्र्यांच्या राजीनाम्यासाठी मुंबईत तळ ठोकण्याची अभिजित दीपके यांची घोषणा

जन सम्राट टाईम्स

**नाशिक | प्रतिनिधी**

आदिवासी आश्रमशाळा व वसतिगृहांमधील विविध प्रश्नांसाठी नाशिकच्या ईदगाह मैदानावर गेल्या दोन आठवड्यांपासून सुरू असलेल्या आदिवासी विद्यार्थ्यांच्या बेमुदत उपोषणाला आता राजकीय पाठिंबा मिळू लागला आहे. कॉंक्रोच जनता पार्टी (सीजेपी)चे संस्थापक अभिजित दीपके यांनी आंदोलनस्थळी भेट देत विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा जाहीर केला. तसेच आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके यांच्या राजीनाम्यासह संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईच्या मागणीसाठी मुंबईत आंदोलन करण्याची घोषणा केली.



'आदिवासी विकास मंत्र्यांना सेंट्रल किचनमधून विद्यार्थ्यांना शिक्षण मिळते की जेवण, याचीच माहिती नाही. अशा परिस्थितीत आदिवासींचा विकास कसा होणार?' असा सवाल दीपके यांनी उपस्थित केला. आंदोलनाला 'तमाशा' संबोधणाऱ्या सचिवांवरही कारवाई करण्याची मागणी त्यांनी केली.

आश्रमशाळांमधील उघडी शौचालये, अस्वच्छ पाणी, निकृष्ट दर्जाचे अन्न तसेच विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांची छायाचित्रे दाखवत दीपके यांनी सरकारच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले. विद्यार्थ्यांच्या मागण्यांकडे सरकारने गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने तोडगा काढावा, अशी मागणी त्यांनी केली.

### जिल्हा परिषद शाळा, आश्रमशाळांची पाहणी करण्याचे आवाहन

**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील जिल्हा परिषद शाळा आणि आदिवासी आश्रमशाळांची एकत्रित पाहणी करावी, असे आवाहनही दीपके यांनी केले. विद्यार्थ्यांना उपलब्ध असलेल्या शिक्षण, भोजन, पाणी, स्वच्छता आणि निवासाच्या सुविधांची प्रत्यक्ष पाहणी केल्यास वस्तुस्थिती स्पष्ट होईल, असा दावा त्यांनी केला.**

दरम्यान, मंत्री डॉ. उईके यांच्याकडून आंदोलनकर्त्या विद्यार्थ्यांची समजूत काढण्याचे प्रयत्न झाले; मात्र ते निष्फळ ठरल्याचे आंदोलनकर्त्यांचे म्हणणे आहे. त्यानंतर बुधवारी लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांनी, तर गुरुवारी (दि. 3) शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी आंदोलनस्थळी भेट देऊन विद्यार्थ्यांच्या मागण्यांना पाठिंबा दिला. त्यामुळे या आंदोलनाला आता राजकीय धार मिळत आहे.

# ५ लाखांच्या विहिरीसाठी २५ हजारांची मागणी?

## पैसे न दिल्याने अनुदान रोखल्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा प्रतिनिधी । भुवनेश दुसाने**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) मंजूर झालेल्या विहिरीचे अनुदान मिळवून देण्यासाठी २५ हजार रुपये घेतल्याचा आणि पैसे देण्यास असमर्थ ठरल्याने आपले बिल थांबवण्यात आल्याचा गंभीर आरोप नांद्रा येथील एका लाभार्थी महिलेने केला आहे. याबाबत ८ ऑगस्ट २०२६ रोजी पाचोरा गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार करूनही तब्बल २३ दिवस उलटले तरी कोणतीही चौकशी झालेली नसल्याचा दावा तक्रारदारांकडून करण्यात आला आहे. त्यामुळे आता जळगाव जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे तक्रार करण्याचा इशारा देण्यात आला आहे.

नांद्रा येथील अल्पभूधारक शेतकरी मंगलाबाई बापू पाटील यांना २०२४-२५ या वर्षात मनरेगाअंतर्गत पाच लाख रुपयांची अनुदानित विहीर मंजूर करण्यात आली होती. विहिरीचे काम पूर्ण होऊन सुमारे आठ महिने झाले असल्याचे तक्रारदारांचे म्हणणे आहे. मात्र, आतापर्यंत केवळ ४५ हजार रुपये मिळाले असून, तीन मस्टर काढण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

तक्रारदार महिलेचे पुत्र समाधान बापू पाटील यांनी लेखी तक्रारीत गंभीर आरोप केले आहेत. विहीर मंजूर करण्यासाठी पंचायत समितीतील एका कर्मचाऱ्याने जबाबदार मध्यस्थामार्फत २५ हजार रुपये घेतल्याचे त्यांनी तक्रारीत नमूद केल्याचा दावा आहे. ज्यांनी पैसे दिले, त्यांच्या विहिरींचे मस्टर व बिले काढण्यात आली; मात्र आपण पैसे देऊ शकलो नसल्याने आपले बिल थकवण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

### २३ दिवसांत चौकशी नाही

या प्रकरणी ८ ऑगस्ट रोजी पाचोरा गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार करण्यात आली. मात्र, तक्रार करून २३ दिवस उलटूनही कोणतीही चौकशी झाली नसल्याने तक्रारदारांनी नाराजी व्यक्त केली आहे. तक्रार गटविकास अधिकाऱ्यांच्या कार्यालयात सादर झाल्यानंतर ती मनरेगा विभागाकडे कोणी पाठवली, याचीही चौकशी करण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे. तक्रारीनंतरही कारवाई न झाल्याने आता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव यांच्याकडे लेखी तक्रार करण्याचा निर्णय घेतल्याचे समाधान पाटील यांनी सांगितले. संबंधित प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणीही त्यांनी केली आहे.

## अंतराळातून भारताच्या सीमांवर 'नजर'; EOS-05चे यशस्वी प्रक्षेपण

**श्रीहरिकोटा :** भारताच्या अंतराळ आणि राष्ट्रीय सुरक्षा क्षमतेच्या दृष्टीने शुक्रवार, ४ सप्टेंबर २०२६ हा महत्त्वाचा दिवस ठरला. भारतीय अंतराळ संशोधन संस्था अर्थात इस्रोने (ISRO) GSLV-F17 रॉकेटच्या माध्यमातून EOS-05 या अत्याधुनिक पृथ्वी निरीक्षण उपग्रहाचे पहाटे २ वाजून ५५ मिनिटांनी यशस्वी प्रक्षेपण केले. श्रीहरिकोटा येथील सतीश धवन अंतराळ केंद्रातून ही मोहीम पार पडली. इस्रोच्या अधिकृत माहितीनुसार EOS-05 नियोजित कक्षेत यशस्वीरीत्या पोहोचवण्यात आला आहे. EOS-05 हा भारताचा जिओसिंक्रोनस कक्षेत कार्य करणारा पहिला समर्पित इमेजिंग उपग्रह आहे.

# गणेशोत्सवात नागपुरातही डीजे बंदीची मागणी; सार्वजनिक गणेश मंडळांची नाराजी

जन सम्राट टाईम्स

**नागपूर | प्रतिनिधी**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर पुण्यानंतर आता नागपूर शहरातही डीजेच्या वापरावर बंदी घालण्याची मागणी जोर धरू लागली आहे. नागपूरचे माजी महापौर संदीप जोशी यांनी गणेशोत्सवादरम्यान होणाऱ्या कर्णकर्कश ध्वनिप्रदूषणाचा मुद्दा उपस्थित करत प्रशासनाने यंदा न्यायालयाच्या निर्देशांची कठोरपणे अंमलबजावणी करावी, अशी मागणी केली आहे. त्यांच्या या भूमिकेमुळे गणेशोत्सवातील डीजे आणि ध्वनिप्रदूषणाचा विषय पुन्हा चर्चेत आला आहे.

गणेशोत्सवाच्या काळात शहरातील विविध सार्वजनिक गणेश मंडळांकडून मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम आणि विसर्जन सोहळ्यांचे आयोजन केले जाते. या वेळी मोठ्या आवाजात डीजे आणि ध्वनिक्षेपकांचा वापर होत असल्याने नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. विशेषतः रुग्णालये, निवासी भाग, ज्येष्ठ नागरिक आणि लहान मुलांवर मोठ्या आवाजाचा परिणाम होण्याची शक्यता असल्याचे संदीप जोशी यांनी निदर्शनास आणले.



त्यांच्या म्हणण्यानुसार, डीजेमधून निर्माण होणारे अत्याधिक ध्वनिप्रदूषण हे केवळ गैरसोयीचे कारण नसून आरोग्याच्या दृष्टीनेही गंभीर बाब आहे. मोठ्या आवाजामुळे तणाव, झोपेचा त्रास, श्रवणशक्तीवर परिणाम यांसह हृदयविकाराच्या रुग्णांना धोका निर्माण होऊ शकतो, असा दावा त्यांनी केला आहे. त्यामुळे उत्सव साजरा करताना इतर नागरिकांच्या आरोग्याचा आणि शांततेच्या अधिकाराचाही विचार होणे आवश्यक असल्याचे त्यांनी म्हटले. न्यायालयाच्या निर्देशांची अंमलबजावणी करण्याची मागणी

ध्वनिप्रदूषणासंदर्भात न्यायालयाने वेळोवेळी स्पष्ट निर्देश दिले आहेत. मात्र, प्रत्यक्षात अनेक ठिकाणी या नियमांचे अपेक्षित पालन होत नसल्याची खंत जोशी यांनी व्यक्त केली. यंदाच्या गणेशोत्सवात प्रशासनाने ध्वनिप्रदूषणाच्या नियमांची प्रभावी अंमलबजावणी करावी आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कारवाई करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, डीजेवरील बंदी किंवा ध्वनिक्षेपकांच्या वापरावरील निर्बंधांमुळे सार्वजनिक गणेश मंडळांमध्ये नाराजी निर्माण होण्याची शक्यता आहे. गणेशोत्सवातील पारंपरिक वाद्ये, ढोल-ताशे आणि सांस्कृतिक कार्यक्रमांना प्रोत्साहन देताना ध्वनिप्रदूषणाचे नियम पाळण्याचे आव्हान प्रशासनासमोर राहणार आहे.

### 'सर्वधर्मीयांसाठी समान नियम असावेत'

संदीप जोशी यांनी ही मागणी कोणत्याही एका धर्माच्या उत्सवापुरती मर्यादित नसल्याचे स्पष्ट केले आहे. ध्वनिप्रदूषणासंदर्भातील कायदे आणि न्यायालयीन निर्देश सर्वधर्मीय कार्यक्रमांसाठी समान पद्धतीने लागू झाले पाहिजेत, अशी त्यांची भूमिका आहे.

# मराठवाड्यातून २११ कंपन्या बाहेर; समृद्धी महामार्गावर दरोडे

जन सम्राट टाईम्स

**छत्रपती संभाजीनगर | प्रतिनिधी:**

"राजकारणापलीकडे जाऊन आता विकासाचा विचार करण्याची वेळ आली आहे. महाविकास आघाडी सरकारच्या काळात आम्ही सुरू केलेल्या कामांचे श्रेय भाजपने घ्यावे, मात्र मराठवाड्याची रखडलेली विकासकामे पूर्ण करावीत," असा रोखठोक सल्ला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आमदार आदित्य ठाकरे यांनी राज्य सरकारला दिला. छत्रपती संभाजीनगर दौऱ्यात पत्रकार परिषदेत बोलताना आदित्य ठाकरे यांनी मराठवाड्यातील उद्योग, रोजगार, आर्थिक विकास, कायदा-सुव्यवस्था आणि आरक्षणाच्या प्रश्नांवरून सरकारवर जोरदार टीका केली.

### २११ कंपन्या बंद किंवा राज्याबाहेर

मराठवाड्यातील औद्योगिक परिस्थितीवर चिंता व्यक्त करताना आदित्य ठाकरे म्हणाले की, "गेल्या काही काळात मराठवाड्यातील तब्बल २११ कंपन्या एकतर बंद पडल्या आहेत किंवा राज्याबाहेर गेल्या आहेत." मोठी निवडणूक नसतानाही सरकारचे लक्ष विकासाकडे नसून राजकारणाकडेच असल्याचा आरोप त्यांनी केला. मराठवाड्यात उद्योगांना पोषक वातावरण निर्माण करून रोजगाराच्या संधी वाढविण्याची गरज असल्याचेही त्यांनी नमूद केले. महाराष्ट्रातील उद्योगांची सद्यस्थिती स्पष्ट करण्यासाठी सरकारने श्वेतपत्रिका जाहीर करावी, अशी मागणी त्यांनी केली.

### समृद्धी महामार्गावरील दरोड्यांवर सवाल

राज्यातील कायदा-सुव्यवस्थेच्या प्रश्नावरही आदित्य ठाकरे यांनी सरकारला लक्ष्य केले. "एकीकडे वॉर रूममध्ये मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांचे आपापसांत वाद सुरू आहेत, तर दुसरीकडे समृद्धी महामार्गावर दरोडे पडत आहेत. अशा परिस्थितीत राज्यातील जनतेला सुरक्षेची हमी कोण देणार?" असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

### "कोणाच्याही हक्काचे काढू नका

मराठा आरक्षण आणि राज्यातील वाढत्या सामाजिक असंतोषावर बोलताना आदित्य ठाकरे यांनी कोणत्याही समाजाच्या हक्काला धक्का न लावता पात्र समाजघटकांना त्यांच्या अधिकाराचे आरक्षण मिळाले पाहिजे, अशी भूमिका मांडली.

जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# लग्नाच्या पंगतीसाठीही FDAची परवानगी! सात दिवस आधी द्यावी लागणार माहिती

## तुकाराम मुंढेंचा नवा नियम; भंडारा, महाप्रसाद, लंगर, इफ्तारपासून लग्नाच्या जेवणापर्यंत नियम लागू

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी:**

लग्नसमारंभातील पंगत, भंडारा, महाप्रसाद, लंगर किंवा इफ्तार पार्टी आयोजित करण्यापूर्वी आता अन्न व औषध प्रशासनाला (FDA) पूर्वसूचना देणे आवश्यक होणार आहे. महाराष्ट्राचे FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांनी सामूहिक भोजनाच्या कार्यक्रमांसाठी अन्नसुरक्षेच्या दृष्टीने नवी नियमावली जाहीर केली आहे. त्यानुसार कार्यक्रमाच्या किमान सात दिवस आधी संबंधित FDA अधिकाऱ्यांकडे माहिती आणि आवश्यक परवानगीची प्रक्रिया पूर्ण करावी लागणार आहे.

विशेष म्हणजे, या नियमांच्या कक्षेत लग्नसमारंभातील जेवणाचाही समावेश करण्यात आला आहे. मात्र, याचा थेट संबंध वधू-वर किंवा त्यांच्या कुटुंबीयांशी नसून जेवणाची व्यवस्था करणाऱ्या केटरर्स आणि सामूहिक भोजनाच्या आयोजनाशी आहे. कार्यक्रमासाठी कोणता केटरर नियुक्त केला आहे, जेवणाचा मेनू काय आहे, पाण्याचा स्रोत कोणता आहे तसेच अन्नपदार्थांसाठी लागणारा कच्चा माल कुठून आणला जाणार आहे, याची माहिती देण्याची तरतूद करण्यात आली आहे.



### कोणत्या कार्यक्रमांना नियम?

महाप्रसाद, भंडारा, अन्नछत्र, लंगर, इफ्तार मेजवानी तसेच मोठ्या प्रमाणावर सामूहिक भोजनाचे आयोजन करणाऱ्या कार्यक्रमांना या नियमांचा सामना करावा लागणार आहे. गणेशोत्सव, नवरात्र, दिवाळी, ईद, ख्रिसमस यांसह विविध सण-उत्सवांच्या काळात मोठ्या प्रमाणावर अन्न तयार केले आणि वितरित केले जाते. त्यामुळे अशा कार्यक्रमांमध्ये अन्नाची गुणवत्ता आणि स्वच्छता राखण्यासाठी FDAकडून विशेष लक्ष दिले जाणार आहे.

### कच्च्या मालाच्या स्रोतावरही नजर

कार्यक्रमासाठी अन्न तयार करणाऱ्या केटरर्सना वापरण्यात येणाऱ्या कच्च्या मालाची माहिती देणे महत्त्वाचे ठरणार आहे. दूध, खवा, पनीर, तूप, मिठाई, सुका मेवा, पाणी, बर्फ, खाद्यतेल आणि खाद्यरंग यांसारख्या अन्नपदार्थांच्या गुणवत्तेकडे विशेष लक्ष दिले जाणार आहे. FDAचे अधिकारी प्राप्त माहितीच्या आधारे आवश्यकतेनुसार कार्यक्रमस्थळी तपासणी करू शकतात.

### 'कार्यक्रमांवर बंधन आणणे हा उद्देश नाही'

तुकाराम मुंढे यांनी स्पष्ट केले आहे की, धार्मिक किंवा सामाजिक कार्यक्रमांवर बंधने आणणे हा या निर्णयामागील उद्देश नसून नागरिकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्न मिळावे, हा मुख्य हेतू आहे. सण-उत्सवांच्या काळात अन्नपदार्थांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने भेसळ किंवा निकृष्ट दर्जाच्या अन्नाचा धोका वाढू शकतो. त्यामुळे वर्षभरासाठी अन्नसुरक्षा कारवाईचा विशेष कृती आराखडा तयार करण्यात आला आहे.

महत्त्वाचे म्हणजे, या नियमांमध्ये कोणत्याही एका धर्माच्या कार्यक्रमाला लक्ष्य करण्यात आलेले नसून विविध धर्मीय आणि सामाजिक कार्यक्रमांसाठी अन्नसुरक्षेचे समान निकष लागू करण्याचा FDAचा प्रयत्न आहे. कार्यक्रमांमध्ये अन्न तयार करणारे केटरर्स नियमांचे पालन करतात की नाही, याची तपासणी केली जाणार आहे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधितांविरोधात कायदेशीर कारवाईची तरतूद असल्याचेही FDAकडून स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे लग्नसमारंभ, धार्मिक कार्यक्रम किंवा मोठ्या सामूहिक भोजनाचे आयोजन करणाऱ्या मंडळे, संस्था आणि आयोजकांनी कार्यक्रमाचे नियोजन करताना FDAच्या नव्या अन्नसुरक्षा प्रक्रियेची माहिती घेणे आवश्यक ठरणार आहे.

# दिशा सालियन प्रकरणी CBI चौकशीचे आदेश

## आदित्य ठाकरेंची पहिली प्रतिक्रिया; म्हणाले, “या प्रकरणाशी माझा काहीही संबंध नाही”

जन सम्राट टाईम्स

**मुंबई |** दिवंगत सेलिब्रिटी मॅनेजर दिशा सालियन यांच्या मृत्यूचे प्रकरण तब्बल सहा वर्षांनंतर पुन्हा एकदा चर्चेत आले आहे. मुंबई उच्च न्यायालयाने या प्रकरणाच्या तपासाबाबत महत्त्वाचे निर्देश देत केंद्रीय अन्वेषण विभागाला (CBI) नव्याने चौकशी करण्याचे आदेश दिल्यानंतर राजकीय वर्तुळातही खळबळ उडाली आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) नेते आदित्य ठाकरे यांनी प्रथमच प्रतिक्रिया दिली आहे.

CBI चौकशीच्या आदेशानंतर आदित्य ठाकरे यांना दिशा सालियन प्रकरणाबाबत प्रश्न विचारण्यात आला. त्यावर त्यांनी या प्रकरणाशी आपला कोणताही संबंध नसल्याचे स्पष्ट केले. “या प्रकरणाशी माझा काहीही संबंध नाही,” असे आदित्य ठाकरे यांनी म्हटले आहे. तसेच, आपल्यावरील आरोप निराधार असून गेल्या काही वर्षांपासून राजकीय हेतूने आपली बदनामी करण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप त्यांनी केला.

### उच्च न्यायालयाच्या आदेशामुळे प्रकरणाला पुन्हा वेग

दिशा सालियन यांच्या वडिलांनी मुलीच्या मृत्यूच्या तपासाबाबत प्रश्न उपस्थित करत मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. तपासादरम्यान काही गंभीर बाबींकडे दुर्लक्ष झाल्याचा दावा याचिकेत करण्यात आला होता.

या प्रकरणाची दखल घेत न्यायालयाने तपासाच्या पद्धतीबाबत प्रश्न उपस्थित केले. त्यानंतर प्रकरणाची नव्याने चौकशी करण्याचे निर्देश देण्यात आले. CBIने FIR दाखल करून या प्रकरणाचा सविस्तर तपास करावा, तसेच मुंबई पोलिसांकडे उपलब्ध असलेली संबंधित कागदपत्रे आणि तपासाची माहिती CBIकडे हस्तांतरित करावी, असे निर्देश न्यायालयाने दिले आहेत.



मात्र, तपास पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही व्यक्तीला आरोपी ठरवू नये, असेही न्यायालयाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे या तपासातून नेमकी कोणती माहिती समोर येते, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

### नेमके काय आहे दिशा सालियन प्रकरण?

दिशा सालियन या काही काळ अभिनेता सुशांत सिंह राजपूत यांच्या मॅनेजर म्हणून कार्यरत होत्या. 8 जून 2020 रोजी मुंबईतील एका इमारतीवरून पडून त्यांचा मृत्यू झाला होता. त्यांच्या मृत्यूनंतर काही दिवसांनी सुशांत सिंह राजपूत यांचाही मृत्यू झाला. त्यामुळे दोन्ही घटनांचा परस्पर संबंध असल्याच्या चर्चा त्यावेळी सोशल मीडिया आणि राजकीय वर्तुळात मोठ्या प्रमाणात रंगल्या होत्या. आता मुंबई उच्च न्यायालयाच्या निर्देशानंतर CBIकडून दिशा सालियन यांच्या मृत्यूचा नव्याने तपास केला जाणार आहे. या तपासातून त्यांच्या मृत्यूमागील नेमकी परिस्थिती काय होती आणि आतापर्यंत अनुत्तरित राहिलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळतात का, याकडे देशाचे लक्ष लागले आहे. दरम्यान, या प्रकरणाशी आपला कोणताही संबंध नसल्याचे आदित्य ठाकरे यांनी स्पष्ट केल्याने CBIच्या तपासासोबतच या प्रकरणावरून होणाऱ्या राजकीय आरोप-प्रत्यारोपांनाही पुन्हा धार येण्याची शक्यता आहे.

#### दिशा सालियन प्रकरणातील महत्त्वाचे मुद्दे

- 8 जून 2020 — दिशा सालियन यांचा मुंबईतील इमारतीवरून पडून मृत्यू.
- दिशा सालियन काही काळ सुशांत सिंह राजपूत यांच्या मॅनेजर म्हणून कार्यरत होत्या.
- दिशाच्या मृत्यूनंतर काही दिवसांनी सुशांत सिंह राजपूत यांचाही मृत्यू झाला.
- दोन्ही घटनांमध्ये संबंध असल्याच्या चर्चा त्यानंतर सुरू झाल्या.
- दिशा सालियन यांच्या वडिलांनी तपासाबाबत प्रश्न उपस्थित करत न्यायालयात याचिका दाखल केली.
- मुंबई उच्च न्यायालयाने CBI चौकशीचे निर्देश दिले.
- मुंबई पोलिसांकडील संबंधित कागदपत्रे CBIकडे देण्याचे निर्देश.
- तपास पूर्ण होण्यापूर्वी कोणालाही आरोपी ठरवू नये, असे न्यायालयाचे स्पष्ट निर्देश.
- आदित्य ठाकरे यांची प्रतिक्रिया — “या प्रकरणाशी माझा काहीही संबंध नाही.”
- आरोप निराधार असून राजकीय हेतूने बदनामी करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आदित्य ठाकरेंचा दावा.

# बोदवड शहरासह तालुक्यात चोऱ्यांचे सत्र

जन सम्राट टाईम्स

**बोदवड | प्रतिनिधी:** बोदवड शहरासह तालुका परिसरात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याचे दिसून येत आहे. बंद दुकाने व कार्यालयांना चोरट्यांकडून लक्ष्य केले जात असल्याने व्यापारी आणि नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. १ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री बसस्थानक परिसरातील पत्रकार सुरेश कोळी यांच्या कार्यालयात भिंत तोडून चोरट्यांनी प्रवेश केल्याची घटना घडली. यावेळी कार्यालयातील महत्त्वाची कागदपत्रे तसेच सुमारे २० हजार रुपयांची रोकड चोरीला गेल्याची माहिती समोर आली आहे. याच परिसरातील अमोल घुले यांच्या रॉयल चॉईस मेन्स वेअर या दुकानाच्या मागील बाजूच्या दरवाजाची कडी तोडून चोरट्यांनी चोरीचा प्रयत्न केल्याचेही समोर आले आहे. दरम्यान, ३ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी सुमारे १२ वाजता रेणुका मंदिराजवळील राजेंद्र अग्रवाल यांच्या सहेली जनरल स्टोअर्समध्ये चोरी झाल्याची घटना घडली होती. या घटनेत सुमारे ६० ते ७० हजार रुपयांचा मुद्देमाल चोरीला गेल्याची माहिती आहे. शहरात अल्पावधीत चोरीच्या घटना घडत असल्याने पोलिसांच्या रात्रीच्या गस्तीवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. व्यापारी व नागरिकांमध्ये असुरक्षिततेची भावना निर्माण झाली असून, चोरीच्या घटनांचा तातडीने तपास करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी होत आहे. रात्रीची गस्त वाढविण्याची मागणी चोरीच्या घटना रोखण्यासाठी पोलिस प्रशासनाने शहरातील प्रमुख भागांमध्ये रात्रीची गस्त वाढवावी. तसेच बसस्थानक परिसर, बाजारपेठ आणि संवेदनशील ठिकाणांवरील सीसीटीव्ही फुटेज तपासून चोरट्यांचा शोध घ्यावा, अशी अपेक्षा नागरिक व व्यापाऱ्यांकडून व्यक्त करण्यात येत आहे. चोरीच्या घटनांना आळा घालण्यासाठी पोलिस प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी जोर धरत आहे.

जन सम्राट टाईम्स — ब्रेक न्यूज

# अवमानकारक वक्तव्याच्या निषेधार्थ बोदवड बंदची हाक

## मातंग समाजाचे पोलिस ठाण्यात निवेदन



जन सम्राट टाईम्स

**बोदवड | प्रतिनिधी :** बोदवड तहसील कार्यालयासमोर १ सप्टेंबर रोजी झालेल्या आंदोलनादरम्यान मातंग समाजाबाबत अवमानकारक व आक्षेपार्ह वक्तव्य करण्यात आल्याचा आरोप करत सकल मातंग समाजाच्या वतीने गुरुवार, ३ सप्टेंबर रोजी बोदवड शहर बंदची हाक देण्यात आली आहे. यासंदर्भात सकल मातंग समाज, बोदवड यांच्या वतीने बोदवड पोलिस ठाण्यात निवेदन देण्यात आले. निवेदनानुसार, तहसील कार्यालयासमोरील आंदोलनादरम्यान तालुक्याबाहेरील काही व्यक्तींनी मातंग समाजाविषयी आक्षेपार्ह व अवमानकारक वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच दोन समाजांमध्ये तेढ निर्माण होईल अशा स्वरूपाचे भाष्य करण्यात आल्याने समाजबांधवांसह नागरिकांच्या भावना दुखावल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. निषेधार्थ ३ सप्टेंबर रोजी बोदवड शहर बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. बंदची पूर्वसूचना पोलिस प्रशासनाला देण्यात आली असून, १ सप्टेंबर रोजी झालेल्या कथित वक्तव्याची सखोल चौकशी करून संबंधित व्यक्तींवर कायद्यानुसार आवश्यक ती कारवाई करावी, अशी मागणी सकल मातंग समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. शहरातील शांतता व सामाजिक सलोखा कायम ठेवत प्रशासनाने या प्रकरणाची योग्य ती चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी अपेक्षा समाजबांधवांनी व्यक्त केली आहे.बोदवड तहसील कार्यालयासमोर १ सप्टेंबर रोजी झालेल्या आंदोलनादरम्यान मातंग समाजाबाबत अवमानकारक व आक्षेपार्ह वक्तव्य करण्यात आल्याचा आरोप करत सकल मातंग समाजाच्या वतीने गुरुवार, ३ सप्टेंबर रोजी बोदवड शहर बंदची हाक देण्यात आली आहे. यासंदर्भात सकल मातंग समाज, बोदवड यांच्या वतीने बोदवड पोलिस ठाण्यात निवेदन देण्यात आले. निवेदनानुसार, तहसील कार्यालयासमोरील आंदोलनादरम्यान तालुक्याबाहेरील काही व्यक्तींनी मातंग समाजाविषयी आक्षेपार्ह व अवमानकारक वक्तव्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच दोन समाजांमध्ये तेढ निर्माण होईल अशा स्वरूपाचे भाष्य करण्यात आल्याने समाजबांधवांसह नागरिकांच्या भावना दुखावल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या कथित वक्तव्याच्या निषेधार्थ ३ सप्टेंबर रोजी बोदवड शहर बंद ठेवण्याचे आवाहन करण्यात आले.

# कानळदा येथे आर्थिक साक्षरता प्रशिक्षणाला उत्स्फूर्त प्रतिसाद

## विमा व पेन्शन योजनांबाबत ग्रामस्थांना मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स



**जळगाव। प्रतिनिधी:** भारतीय रिझर्व्ह बँक, सेंट्रल बँक ऑफ इंडिया व नाबार्ड यांच्या सहकार्याने तसेच ॲक्सेस डेव्हलपमेंट सर्व्हिसेस, दिल्ली संचालित मनीवाइज सेंटर फॉर फायनान्शियल लिटरसी, जामनेर ब्लॉक, जळगाव यांच्या अंतर्गत कानळदा येथे आर्थिक साक्षरता प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला ग्रामस्थ, महिला व बचत गटांच्या सदस्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. कार्यक्रमात रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे जळगाव विभागातील एलडीओ श्री. आकर्षण अविनाश यांनी बँकिंग लोकपाल, ग्राहकांचे हक्क व विविध बँकिंग सुविधा याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच शेतकरी व महिला बचत गटांसाठी उपयुक्त असलेल्या विविध आर्थिक योजनांची माहिती त्यांनी दिली. अकोला विभागाचे क्षेत्रीय व्यवस्थापक श्री. आकाश मेहेत्रे यांनी सायबर गुन्हे व ऑनलाइन आर्थिक फसवणूक टाळण्यासाठी घ्यावयाची काळजी याबाबत मार्गदर्शन केले. डिजिटल व्यवहार करताना नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन करत त्यांनी सुरक्षित डिजिटल व्यवहाराचे महत्त्व अधोरेखित केले.

कानळदा येथील स्टेट बँक ऑफ इंडिया शाखेचे बँक व्यवस्थापक श्री. अभिलाष वाघ यांनी डिजिटल पेमेंट, विमा, पेन्शन, बचत व गुंतवणूक याबाबत नागरिकांना माहिती दिली. तसेच प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना (PMSBY), प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (PMJJBY), अटल पेन्शन योजना (APY) आदी योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करताना अमळनेर केंद्राचे केंद्र व्यवस्थापक श्री. सुनील भील यांनी सुशिक्षित बेरोजगार युवकांसाठी RSETIच्या माध्यमातून राबविण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षण व स्वयंरोजगाराच्या योजनांची माहिती दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी ग्रामपंचायत कानळदाच्या वतीने ग्रामपंचायत सदस्य श्री. जगदीश सपकाळे यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य श्री. भिकन सपकाळे उपस्थित होते. सामाजिक कार्यकर्ते श्री. सुनील भाऊ गायकवाड यांनी ग्रामस्थांच्या विविध समस्या व अडचणी मांडल्या. सामाजिक कार्यकर्ते श्री. रविभाऊ मोरे यांनी कार्यक्रमासाठी सहकार्य केले.

# मोठे वाघोदे येथे केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहात संपन्न!

## पाठ नियोजन व शालेय पोषण आहारावर मार्गदर्शन


जन सम्राट टाईम्स



**वाघोदा| प्रतिनिधी:** तालुक्यातील समूह साधन केंद्र कुंभारखेडा अंतर्गत केंद्रस्तरीय शिक्षण परिषद सोमवार, ३१ ऑगस्ट २०२६ रोजी मोठ्या उत्साहात संपन्न झाली. या परिषदेचे आयोजन जिल्हा परिषद मराठी मुलांची शाळा, मोठे वाघोदे येथे करण्यात आले. केंद्रप्रमुख श्री. मनोज माळी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या परिषदेत मागील महिन्यातील शैक्षणिक कामकाजाचा आढावा घेण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत शिक्षकांमध्ये विचारविनिमय करण्यात आला. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी प्रभावी व नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याबाबतही चर्चा झाली. शिक्षण परिषदेचे सूत्रसंचालन उपक्रमशील शिक्षक श्री. रामेश्वर कांदे यांनी केले. उपस्थित केंद्रातील सर्व मुख्याध्यापक व शिक्षकांचे स्वागत शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. बडगुजर यांनी केले. परिषदेत विविध विषयांवर शिक्षकांनी सखोल मार्गदर्शन केले. यामध्ये— निपुण अभियान — श्री. मनोज महाजन, शाळा गौरखेडा पाठाचे नियोजन — श्री. रमेश राठोड, शाळा चिनावल शाळा व्यवस्थापन समिती व समुदाय सहभाग — श्री. विठ्ठल राजुरे, शाळा लोहारे बॉईज राज्याचे धोरणात्मक व स्थानिक विषय — श्री. मुकेश पाटील, शाळा कुंभारखेडा या विषयांवर मार्गदर्शक शिक्षकांनी उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. विस्तार अधिकारी तथा शालेय पोषण आहार अधीक्षक श्री. बखाल यांनी शिक्षकांना मार्गदर्शन करताना शालेय पोषण आहार, निपुण भारत व पीजीआय या तीन प्रमुख विषयांवर सखोल माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी नाविन्यपूर्ण, परिणामकारक व विद्यार्थी-केंद्रित उपक्रम राबविण्याचे आवाहनही त्यांनी केले. या शिक्षण परिषदेच्या माध्यमातून शिक्षकांना शैक्षणिक नियोजन, प्रभावी अध्यापन पद्धती आणि विद्यार्थ्यांच्या गुणवत्तावाढीसाठी आवश्यक उपक्रमांची नवी दिशा मिळाली. कार्यक्रमास केंद्रातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शाळेतील मुख्याध्यापक व सर्व शिक्षकांनी सहकार्य केले. सौ. वैशाली चौधरी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# नशिराबादच्या मुख्य प्रवेशद्वाराला झिपरू अण्णा महाराज यांचे नाव

जन सम्राट टाईम्स



**नशिराबाद । प्रतिनिधी:** शहराच्या मुख्य प्रवेशद्वाराला परमपूज्य श्री झिपरू अण्णा महाराज यांचे नाव देण्यात आले असून, त्यांच्या पावन स्मृतींना अभिवादन करणाऱ्या नामफलकाचे उत्साहपूर्ण वातावरणात अनावरण करण्यात आले. या निर्णयामुळे तमाम नशिराबादकरांमध्ये आनंद, समाधान आणि अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. शहराच्या प्रवेशद्वारावर परमपूज्य श्री झिपरू अण्णा महाराज यांचे नाव झळकल्याने नशिराबादला एक नवी ओळख प्राप्त झाली आहे. महाराजांचे कार्य, विचार आणि समाजाला दिलेली प्रेरणा यांची आठवण या नामफलकाच्या माध्यमातून पुढील पिढ्यांपर्यंत जपली जाणार आहे. त्यांच्या पावन स्मृतींना ही एक कायमस्वरूपी आणि प्रेरणादायी आदरांजली ठरणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली. या महत्त्वपूर्ण निर्णयासाठी पुढाकार घेऊन सकारात्मक भूमिका बजावल्याबद्दल नशिराबाद नगरपरिषदेचे लोकनियुक्त नगराध्यक्ष योगेश नारायण पाटील, उपनगराध्यक्ष पंकज भाऊ महाजन, सर्व विभागांचे सभापती, सन्माननीय नगरसेवक-नगरसेविका तसेच नगरपरिषदेचे अधिकारी व कर्मचारी यांचे नागरिकांच्या वतीने आभार व्यक्त करण्यात आले. शिराबादच्या मुख्य प्रवेशद्वारावर आता परमपूज्य श्री झिपरू अण्णा महाराज यांचे नाव अभिमानाने झळकत असल्याने शहरात येणाऱ्या प्रत्येकाचे लक्ष या नामफलकाकडे वेधले जाणार आहे. महाराजांच्या स्मृती आणि विचारांना चिरंतन ठेवणारा हा निर्णय नशिराबादच्या इतिहासात निश्चितच महत्त्वाचा ठरणार असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

# स्वरा भास्कर यांचा निषेध; गुन्हा दाखल करण्याची मागणी



जन सम्राट टाईम्स

**भुसावळ| प्रतिनिधी:** अभिनेत्री स्वरा भास्कर यांनी राणी पद्मावती यांच्याबाबत केलेल्या कथित वक्तव्यावरून श्री राष्ट्रीय राजपूत करणी सेनेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या वक्तव्यामुळे राजपूत समाजाच्या भावना दुखावल्याचा आरोप करत संबंधित वक्तव्याची दखल घेऊन स्वरा भास्कर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करावा तसेच राजपूत समाजाची जाहीर माफी मागावी, अशी मागणी करण्यात आली. यासंदर्भात गुरुवार, ३ सप्टेंबर २०२६ रोजी भुसावळ येथे श्री राष्ट्रीय राजपूत करणी सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी भुसावळ प्रांताधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. राणी पद्मावती यांच्याबाबत करण्यात आलेल्या वक्तव्यामुळे समाजाच्या भावना दुखावल्या असून, या प्रकरणाची योग्य ती चौकशी करून कायदेशीर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. यावेळी करणी सेनेचे पदाधिकारी दामोदर राजपूत, आनंदा राजपूत, संदीप राजपूत, सारिका राजपूत, हर्षल राजपूत, कविता राजपूत, प्रदीप राजपूत, जयश्री राजपूत, नितीन राजपूत, सुरेश राजपूत, मोहिनी राजपूत, सुवर्णा राजपूत, स्मिता राजपूत, प्रियंका राजपूत, श्रद्धा राजपूत, प्रतीक्षा राजपूत, पंकज राजपूत, गोकुळ राजपूत यांच्यासह समाजबांधव उपस्थित होते. निवेदनाद्वारे संबंधित वक्तव्याबाबत कायदेशीर चौकशी करून योग्य ती कारवाई करावी आणि राजपूत समाजाच्या भावना लक्षात घेऊन जाहीर माफी मागण्याची कार्यवाही करावी, अशी मागणी करणी सेनेच्या वतीने करण्यात आली. अभिनेत्री स्वरा भास्कर यांनी राणी पद्मावती यांच्याबाबत केलेल्या कथित वक्तव्यावरून श्री राष्ट्रीय राजपूत करणी सेनेच्या वतीने तीव्र निषेध व्यक्त करण्यात आला. या वक्तव्यामुळे राजपूत समाजाच्या भावना दुखावल्याचा आरोप करत संबंधित वक्तव्याची दखल घेऊन स्वरा भास्कर यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करावा तसेच राजपूत समाजाची जाहीर माफी मागावी, अशी मागणी करण्यात आली. यासंदर्भात गुरुवार, ३ सप्टेंबर २०२६ रोजी भुसावळ येथे श्री राष्ट्रीय राजपूत करणी सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी भुसावळ प्रांताधिकाऱ्यांना निवेदन सादर केले.

# विस्तार अधिकाऱ्याकडून ग्रामपंचायत अधिकाऱ्याला शिवीगाळ

## महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनची गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार

जन सम्राट टाईम्स

**सोयगाव। प्रतिनिधी :** सोयगाव पंचायत समितीतील विस्तार अधिकारी (पं.) अशोक दौड यांनी ग्रुप ग्रामपंचायत निंबायती तांडा येथील ग्रामपंचायत अधिकारी योगेश सपकाळ यांना ग्रामसभेला का उपस्थित राहिला नाही, असा जाब विचारत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून मानसिक त्रास दिल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन, सोयगाव शाखेच्या वतीने करण्यात आला आहे. याप्रकरणी गटविकास अधिकारी वर्ग-१ यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी आयोजित बैठकीदरम्यान तसेच ग्रामसभेच्या अनुषंगाने हा प्रकार घडल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. संबंधित घटनेचे ऑडिओ रेकॉर्डिंग उपलब्ध असल्याचा दावाही युनियनच्या वतीने करण्यात आला आहे. तक्रारीनुसार, संबंधित अधिकाऱ्याच्या कथित वर्तनामुळे शासकीय कार्यालयातील कामकाजाच्या वातावरणावर विपरीत परिणाम होत असून ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे या




प्रकरणाची गांभीर्याने दखल घेऊन विस्तार अधिकारी अशोक दौड यांची तात्काळ चौकशी करून आवश्यक ती प्रशासकीय कारवाई करावी, अशी मागणी युनियनच्या वतीने करण्यात आली आहे. या निवेदनावर महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियनचे तालुकाध्यक्ष विकास क्षीरसागर, सरचिटणीस सुनील मंगरूळे, जिल्हा संघटक श्रीकांत पाटील यांच्यासह सोयगाव तालुक्यातील अनेक ग्रामपंचायत अधिकाऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

ग्रामपंचायत अधिकाऱ्याची स्वतंत्र तक्रार

दरम्यान, ग्रामपंचायत अधिकारी योगेश सपकाळ यांनीही स्वतंत्र निवेदन देऊन विस्तार अधिकारी अशोक दौड यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यासाठी परवानगी देण्याची मागणी केली आहे. तालुक्यात नियोजित वेळेत ग्रामसभा घेण्यात आल्या असतानाही आपल्याला जाणीवपूर्वक त्रास दिला जात असल्याचा आरोप सपकाळ यांनी केला आहे. अशा प्रकारचे वर्तन हे अधिकाऱ्यांचे मानसिक खच्चीकरण करणारे असून, यामुळे ग्रामपंचायत स्तरावरील शासकीय कामकाजावर परिणाम होण्याची शक्यता असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी प्रशासनाकडून चौकशी करून वस्तुस्थिती स्पष्ट करावी आणि दोषी आढळणाऱ्यांवर नियमानुसार कारवाई करावी, अशी मागणी ग्रामपंचायत अधिकारी युनियनकडून करण्यात आली आहे.सोयगाव पंचायत समितीतील विस्तार अधिकारी (पं.) अशोक दौड यांनी ग्रुप ग्रामपंचायत निंबायती तांडा येथील ग्रामपंचायत अधिकारी योगेश सपकाळ यांना ग्रामसभेला का उपस्थित राहिला नाही, असा जाब विचारत अर्वाच्य भाषेत शिवीगाळ करून मानसिक त्रास दिल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत अधिकारी युनियन, सोयगाव शाखेच्या वतीने करण्यात आला आहे. याप्रकरणी गटविकास अधिकारी वर्ग-१ यांच्याकडे लेखी तक्रार दाखल करण्यात आली आहे.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# वीजबिल वसुलीस गेलेल्या कर्मचाऱ्यावर जीवघेणा हल्ला!


## दांडक्याने डोक्यावर वार करण्याचा प्रयत्न; खांद्यावर वार बसल्याने फ्रॅक्चर; महावितरणच्या पथकाला जिवे मारण्याची धमकी

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी:** वीजबिलाच्या थकबाकीची वसुली करण्यासाठी गेलेल्या महावितरणच्या पथकावर हल्ला करून एका तंत्रज्ञाला गंभीर जखमी केल्याची खळबळजनक घटना धुळे तालुक्यातील बाळापूर शिवारात बुधवारी (दि. २ सप्टेंबर) सायंकाळी घडली. वीजपुरवठा खंडित करून स्मार्ट मीटर बसविण्याच्या कारवाईदरम्यान वाद निर्माण झाला आणि त्यानंतर कर्मचाऱ्याला मारहाण करण्यात आल्याचा आरोप आहे.या प्रकरणी सागर पाटील, आकाश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, योगेश (पूर्ण नाव अज्ञात) तसेच चार अनोळखी व्यक्तींविरोधात भारतीय न्याय संहिता आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील विविध १४ कलमांन्वये धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. थकबाकी वसुलीसाठी गेले होते पथक महावितरणकडून सध्या थकीत वीजबिलांच्या वसुलीची मोहीम सुरू आहे. त्यानुसार फागणे उपविभागाचे सहायक अभियंता प्रवीण भामरे, आशिष कासार, प्रधान तंत्रज्ञ रविंद्र चौधरी, तंत्रज्ञ चंद्रकांत पाटील, वरिष्ठ तंत्रज्ञ इंद्रजित नाईक आणि बाह्यस्रोत तंत्रज्ञ रूपेश पाटील हे पथक बाळापूर शिवारातील हॉटेल शांतीसागरजवळील साईसागर ग्रेनाईट मार्बल दुकानावर गेले होते. संबंधित ग्राहकाकडे साडेसहा हजार रुपयांपेक्षा अधिक वीजबिल थकीत असल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. स्मार्ट मीटर बसविण्यावरून वाद पथकाने वीजबिल भरण्याची सूचना केल्यानंतर दुकानातील योगेश नावाच्या व्यक्तीने मालक बाहेर गेल्याचे सांगून ते परत आल्यानंतर बिल भरतील, असे सांगितल्याचे फिर्यादीत नमूद आहे. दरम्यान, महावितरणच्या नियमांनुसार जुना मीटर काढून स्मार्ट मीटर बसविण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली. तंत्रज्ञ चंद्रकांत पाटील यांनी वीजपुरवठा खंडित केला. त्यानंतर स्मार्ट मीटर कंपनीचे प्रतिनिधी मीटर बदलण्याच्या तयारीत असतानाच दुकानाचे मालक सागर पाटील, आकाश पाटील आणि ज्ञानेश्वर पाटील वाहनातून तेथे आले.

'म्हणत वादाला सुरुवात फिर्यादीनुसार, दुकानात आल्यानंतर सागर पाटील यांनी वीजपुरवठा कोणी बंद केला, अशी विचारणा केली. त्यानंतर योगेशने चंद्रकांत पाटील यांच्याकडे बोट दाखवल्याने वाद वाढला.त्यानंतर काही व्यक्तींनी चंद्रकांत पाटील यांना शिवीगाळ व धक्काबुक्की केली.

पुढे आणखी काही व्यक्ती तेथे आल्या आणि त्यांनी हाताबुक्क्यांनी व लाथांनी मारहाण केल्याचा आरोप आहे. लाकडी दांडक्याने हल्ल्याचा आरोप मारहाणीदरम्यान एका अनोळखी व्यक्तीने दुकानाच्या बाजूला पडलेला जाड लाकडी दांडका उचलून चंद्रकांत पाटील यांच्या डोक्यावर वार करण्याचा




प्रयत्न केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. चंद्रकांत पाटील यांनी वार चुकविल्याने दांडक्याचा फटका त्यांच्या उजव्या खांद्यावर बसला. ते खाली कोसळल्यानंतर महावितरणच्या इतर कर्मचाऱ्यांनी त्यांची आरोपींच्या तावडीतून सुटका केली आणि त्यांना तातडीने श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व सर्वोपचार रुग्णालयात दाखल केले. वैद्यकीय तपासणीत त्यांच्या उजव्या खांद्याला फ्रॅक्चर झाल्याचे निदान झाल्याचे सांगण्यात आले. 'पुन्हा लाईट कट करायला आलात तर जिवंत सोडणार नाही' महावितरणच्या पथकाला शिवीगाळ आणि मारहाण करण्यासोबतच पुन्हा वीजपुरवठा खंडित करण्यासाठी आलात तर जिवंत सोडणार नाही, अशी धमकी दिल्याचाही आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. ५ तास ठाण मांडल्यानंतर मध्यरात्री गुन्हा दाखल घटनेनंतर संबंधितांकडून राजकीय दबाव आणण्याचा प्रयत्न झाल्याचा दावा महावितरणच्या अधिकाऱ्यांकडून करण्यात आला.

मात्र अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कायदेशीर कारवाईवर ठाम राहिल्याचे सांगण्यात आले. गुन्हा दाखल करण्यासाठी कार्यकारी अभियंत्यांसह ७ अभियंते आणि ८ तांत्रिक कर्मचारी धुळे तालुका पोलीस ठाण्यात सुमारे पाच तास उपस्थित होते. त्यानंतर रात्री १२.१६ वाजता एफआयआर दाखल करण्यात आला. ८ जणांविरोधात १४ कलमांन्वये गुन्हा सहायक अभियंता प्रवीण भामरे यांच्या फिर्यादीवरून आरोपींविरोधात भारतीय न्याय संहितेतील कलम १०९(१), १३२, १२१(१), १२१(२), १८९(२), १९१(२), १९०, ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) तसेच महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील कलम ३७(१), ३७(३), १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करीत असून, मारहाणीत सहभागी असलेल्या सर्व व्यक्तींची ओळख आणि घटनेमागील नेमकी पार्श्वभूमी तपासली जात आहे. वीजबिलाच्या थकबाकीची वसुली करण्यासाठी गेलेल्या महावितरणच्या पथकावर हल्ला करून एका तंत्रज्ञाला गंभीर जखमी केल्याची खळबळजनक घटना धुळे तालुक्यातील बाळापूर शिवारात बुधवारी (दि. २ सप्टेंबर) सायंकाळी घडली. वीजपुरवठा खंडित करून स्मार्ट मीटर बसविण्याच्या कारवाईदरम्यान वाद निर्माण झाला आणि त्यानंतर कर्मचाऱ्याला मारहाण करण्यात आल्याचा आरोप आहे.या प्रकरणी सागर पाटील, आकाश पाटील, ज्ञानेश्वर पाटील, योगेश (पूर्ण नाव अज्ञात) तसेच चार अनोळखी व्यक्तींविरोधात भारतीय न्याय संहिता आणि महाराष्ट्र पोलीस अधिनियमातील विविध १४ कलमांन्वये धुळे तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. थकबाकी वसुलीसाठी गेले होते पथक महावितरणकडून सध्या थकीत वीजबिलांच्या वसुलीची मोहीम सुरू आहे. त्यानुसार फागणे उपविभागाचे सहायक अभियंता प्रवीण भामरे, आशिष कासार, प्रधान तंत्रज्ञ रविंद्र चौधरी, तंत्रज्ञ चंद्रकांत पाटील, वरिष्ठ तंत्रज्ञ इंद्रजित नाईक आणि बाह्यस्रोत तंत्रज्ञ रूपेश पाटील हे पथक बाळापूर शिवारातील हॉटेल शांतीसागरजवळील साईसागर ग्रेनाईट मार्बल दुकानावर गेले होते.

---

जन सम्राट टाईम्स | ब्रेक न्यूज | ज

## 'बहिणाबाई म्हणजे साहित्याचं विद्यापीठ होय': प्रा. मनोज पाटील




जन सम्राट टाईम्स

**कोळगाव | प्रतिनिधी :** "बहिणाबाई चौधरी यांच्या साहित्यात ग्रामीण सण-उत्सव, निसर्ग, परंपरा, माहेर-सासर, ग्रामीण लग्नसोहळे, चालीरीती, उखाणे अशा विविध विषयांचा समावेश आहे. ग्रामीण जीवनातील हे सर्व पैलू त्यांच्या काव्यातून सहजपणे उमटले आहेत. त्यामुळे बहिणाबाई म्हणजे साहित्याचे विद्यापीठच होय," असे प्रतिपादन मराठी विभागप्रमुख प्रा. मनोज पाटील यांनी केले. तात्यासाहेब हरी रावजी पाटील शिक्षण सहकारी संस्था, भडगाव संचलित कला व विज्ञान महाविद्यालय, कोळगाव येथे खान्देशच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सुरेश आनंदा कोळी होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी प्रा. मनोज पाटील यांनी बहिणाबाईंच्या अहिराणी भाषेतील निसर्गकविता, 'खोप्यामधी खोपा', 'मन पाखरू पाखरू', 'मन वढाय वढाय' या प्रसिद्ध काव्यपंक्तींसह शेतकरी, शेती, माती आणि निसर्गाशी असलेले नाते याविषयी मार्गदर्शन केले.

बहिणाबाईंच्या साहित्यामधून खान्देशातील ग्रामीण जीवन, संस्कृती, परंपरा आणि निसर्गाचे अत्यंत प्रभावी चित्रण झाले असल्याचेही त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. एम. टी. पाटील यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. मनीषा बोरसे यांनी केले, तर आभार प्रा. प्रशांत पाटील यांनी मानले. कार्यक्रमाचे आयोजन महाविद्यालयाच्या मराठी विभागातर्फे करण्यात आले. यावेळी प्रा. मनोज पवार, प्रा. प्रविणा पाटील, प्रा. राहुल सोनवणे, प्रा. दिनकर सूर्यवंशी, प्रा. तुषार पाटील, श्रीकांत हिरे, तेजस पवार, चेतन पाटील यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते. "बहिणाबाई चौधरी यांच्या साहित्यात ग्रामीण सण-उत्सव, निसर्ग, परंपरा, माहेर-सासर, ग्रामीण लग्नसोहळे, चालीरीती, उखाणे अशा विविध विषयांचा समावेश आहे. ग्रामीण जीवनातील हे सर्व पैलू त्यांच्या काव्यातून सहजपणे उमटले आहेत. त्यामुळे बहिणाबाई म्हणजे साहित्याचे विद्यापीठच होय," असे प्रतिपादन मराठी विभागप्रमुख प्रा. मनोज पाटील यांनी केले. तात्यासाहेब हरी रावजी पाटील शिक्षण सहकारी संस्था, भडगाव संचलित कला व विज्ञान महाविद्यालय, कोळगाव येथे खान्देशच्या कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जयंतीनिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. सुरेश आनंदा कोळी होते

---

## जि.प. मराठी शाळांच्या गुणवत्तेची सखोल तपासणी करा!

### 'स्कूल ठीक करो अभियान' अंतर्गत समता सैनिक दलाचे निवेदन

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा । प्रतिनिधी:** पाचोरा तालुक्यातील जिल्हा परिषद मराठी शाळांमधील शैक्षणिक गुणवत्ता, विद्यार्थ्यांची प्रगती आणि शाळांमधील शैक्षणिक व प्रशासकीय व्यवस्थेची प्रत्यक्ष पाहणी करून सखोल तपासणी करावी, अशी मागणी समता सैनिक दलाच्या वतीने करण्यात आली आहे. समता सैनिक दलाचे जळगाव जिल्हाध्यक्ष मार्शल किशोर डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली शाखा पाचोराच्या वतीने ही मागणी करण्यात आली. याबाबत सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी तालुका प्रचारक ज्ञानेश्वर सावळे व जिल्हा प्रचारक अभिमान बाविस्कर यांनी पाचोरा पंचायत समितीच्या गटशिक्षण अधिकाऱ्यांना निवेदन सादर केले. 'स्कूल ठीक करो अभियान' अंतर्गत तपासणीची मागणी देशभर सुरू असलेल्या *'स्कूल ठीक करो अभियान'*च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमध्ये तालुकानिहाय आणि गावनिहाय शाळांचे अहवाल मागविण्याचे



अभियान सुरू असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शाळांची सर्वांगीण गुणवत्ता सुधारण्यासाठी प्रशासनाने केवळ कागदोपत्री माहितीवर अवलंबून न राहता प्रत्यक्ष शाळांना भेट देऊन परिस्थितीची पाहणी करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांची गुणवत्ता, शिक्षकांची उपस्थिती तपासा निवेदनातून शाळांमधील विविध बाबींची तपासणी करण्याची मागणी करण्यात आली आहे. त्यामध्ये— विद्यार्थ्यांची नियमित उपस्थिती व पटसंख्या. विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता व विषयानुसार अध्ययनाची पातळी. शिक्षकांची नियमित उपस्थिती आणि अध्यापनाची गुणवत्ता. पाठ्यपुस्तके व शैक्षणिक साहित्याची उपलब्धता. शासनाकडून उपलब्ध करून दिल्या जाणाऱ्या शैक्षणिक सुविधांची अंमलबजावणी. शाळेतील स्वच्छता, पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहांची व्यवस्था. विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध मूलभूत सुविधा. मध्यान्ह भोजन योजनेची अंमलबजावणी व भोजनाची गुणवत्ता. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीबाबत पालकांना दिली जाणारी माहिती. शाळेतील अभिलेख व उपस्थिती नोंदवही. शाळा परिसराची सुरक्षितता आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेसाठी करण्यात आलेल्या उपाययोजना. या सर्व बाबींची प्रत्यक्ष पाहणी करून आवश्यक कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली आहे.

---

## श्री. गो.से. हायस्कूलच्या मुख्याध्यापकपदी आर.एल.पाटील, उपमुख्याध्यापकपदी पी.एम.पाटील

### पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्थेचा निर्णय

जन सम्राट टाईम्स

**पाचोरा। (प्रतिनिधी):** पाचोरा तालुका सहकारी शिक्षण संस्था संचलित श्री. गो.से. हायस्कूल, पाचोरा येथे कार्यरत मुख्याध्यापक श्री. एन.आर. ठाकरे हे प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या रिक्त झालेल्या पदावर विद्यालयाचे उपमुख्याध्यापक श्री. आर.एल. पाटील यांची मुख्याध्यापकपदी पदोन्नती करण्यात आली आहे. तसेच रिक्त झालेल्या उपमुख्याध्यापकपदी विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक श्री. पी.एम. पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संस्थेचे चेअरमन मा. नानासो. श्री. संजय वाघ, व्हाइस चेअरमन मा. नानासो. श्री. व्ही. टी. जोशी, शालेय समिती चेअरमन मा. दादासो. श्री. खलील देशमुख, तांत्रिक विभाग चेअरमन मा. आण्णासो. श्री. वासुदेव महाजन तसेच संस्थेच्या सन्माननीय संचालक मंडळाच्या उपस्थितीत नवनियुक्त मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापक यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे चेअरमन श्री. संजय वाघ यांनी मनोगत व्यक्त करताना, "श्री. आर.एल. पाटील यांनी उपमुख्याध्यापकपदावर कार्यरत



असताना उत्कृष्ट कामकाज केले असून, विद्यालयाप्रती असलेली त्यांची आस्था व योगदान लक्षात घेऊन त्यांची मुख्याध्यापकपदी पदोन्नती करण्यात आली आहे," असे सांगून त्यांना भावी शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी संस्थेचे ज्येष्ठ संचालक मा. अण्णासो. श्री. दगाजी वाघ, मा. आप्पासो. श्री. सतीश चौधरी, मा. दादासो. श्री. योगेश पाटील, मा. बापूसो. श्री. प्रकाश पाटील, मा. दादासो. श्री. अर्जुनदास पंजाबी, मा. अण्णासाहेब श्री. मधुकर पाटील, मा. आबासो. श्री. एकनाथ महालपुरे तसेच नगरसेवक श्री. सुरज वाघ उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष मा. भाऊसो. श्री. दिलीप वाघ, चेअरमन मा. नानासो. श्री. संजय वाघ, मानद सचिव मा. ॲड. श्री. महेश देशमुख, व्हाइस चेअरमन मा. नानासो. श्री. व्ही.टी. जोशी, शालेय समिती चेअरमन मा. दादासो. श्री. खलिल देशमुख, तांत्रिक विभाग चेअरमन मा. आण्णासो. श्री. वासुदेव महाजन तसेच संस्थेच्या सर्व सन्माननीय संचालक मंडळाने नवनियुक्त मुख्याध्यापक व उपमुख्याध्यापकांचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील शैक्षणिक कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी मुख्याध्यापक श्री. आर.एल. पाटील यांनी संस्थेने सोपविलेली जबाबदारी सक्षमपणे व सुयोग्य पद्धतीने पार पाडत सर्वांच्या सहकार्याने विद्यालयाची अधिकाधिक प्रगती साधण्यासाठी प्रयत्नशील राहण्याची ग्वाही दिली. तसेच नवनियुक्त उपमुख्याध्यापक श्री. पी.एम. पाटील यांनी संस्थेचे आभार मानून विद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. कार्यक्रमास सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री. एन.आर. ठाकरे, शाळेच्या पर्यवेक्षिका सौ. ए.आर. गोहिल, पर्यवेक्षक श्री. आर.बी. बांठिया, श्री. एम.टी. कौंडिण्य, किमान कौशल्य विभागप्रमुख श्री. मनीष बाविस्कर, क्रीडा प्रमुख श्री. एस.पी. करंदे, सांस्कृतिक विभागप्रमुख श्री. आर.बी. बोरसे, कार्यालयीन प्रमुख श्री. अजय सिनकर तसेच विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

---

## अन्यायकारक जीआर रद्द करा, आदिवासी विकास मंत्र्यांचा राजीनामा द्या!

जन सम्राट टाईम्स

**धुळे। प्रतिनिधी:** अन्यायकारक जीआर रद्द करण्यासह आदिवासी विकास मंत्र्यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी धुळ्यात आदिवासी समाजाने आज 'उलगुलान मोर्चा' काढत शासनाविरोधात तीव्र रोष व्यक्त केला. या मोर्चात मोठ्या संख्येने आदिवासी बांधव सहभागी झाले होते. विविध मागण्यांचे फलक हातात घेत आणि घोषणाबाजी करत आदिवासी समाजाने आपला संताप व्यक्त केला. आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांसाठी समाज रस्त्यावर पुणे आणि नाशिक येथे आदिवासी विद्यार्थ्यांकडून गेल्या काही दिवसांपासून विविध मागण्यांसाठी उपोषण सुरू होते. या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी धुळ्यातही काही आदिवासी तरुणांनी उपोषण सुरू केले होते. उपोषणादरम्यान काही तरुणांची प्रकृती खालावल्याने आंदोलनाचा मुद्दा अधिक तीव्र झाला. या आंदोलनाला आदिवासी समाजासह विविध संघटनांनी पाठिंबा दिला. अखेर विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आदिवासी समाज मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरला. विविध



मागण्यांसाठी आक्रमक भूमिका अन्यायकारक जीआर रद्द करावा, आदिवासी विकास मंत्र्यांनी राजीनामा द्यावा, आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांच्या कुटुंबीयांना एक कोटी रुपयांची मदत द्यावी, विद्यार्थ्यांसाठी लागू करण्यात आलेली सेंट्रल किचन पद्धत रद्द करावी, यासह विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या. आदिवासी विद्यार्थ्यांच्या शिक्षण, सुरक्षितता आणि भवितव्याशी संबंधित प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी मोर्चातील पदाधिकाऱ्यांनी केली. प्रकाश टाकी चौकातून मोर्चाला सुरुवात धुळ्यातील प्रकाश टाकी चौकातून मोर्चाला सुरुवात झाली. त्यानंतर मोर्चा पारोळा रोडमार्गे जुने मनपा, झाशी राणी पुतळा, नवीन मनपा मार्गे जेल रोड येथे पोहोचला. याठिकाणी मोर्चाचा समारोप करण्यात आला. मोर्चादरम्यान आदिवासी समाजातील विविध पदाधिकाऱ्यांनी आपल्या भाषणातून शासनाच्या धोरणांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. आदिवासी समाजाच्या मागण्यांकडे शासनाने गांभीर्याने पाहून तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली. आदिवासी समाजाच्या एकजुटीचे प्रदर्शन या मोर्चातून आदिवासी समाजातील विविध संघटना आणि कार्यकर्त्यांची एकजूट पाहायला मिळाली. आदिवासी विद्यार्थ्यांच्या हक्कांसाठी आणि त्यांच्या भवितव्यासाठी संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला. मोर्चात आदिवासी क्रांती सेनेचे भरत जाधव, दिनेश पिंपळसे, संजय मोरे, अनिल सोनवणे, लक्ष्मण पवार, सुनील ठाकरे यांच्यासह आदिवासी समाजाचे शेकडो बांधव सहभागी झाले होते.

---

## जरांगेंच्या समर्थनार्थ धुळ्यात मराठा समाज आक्रमक

### मागण्या मान्य न झाल्यास मंत्री, आमदार-खासदारांना रस्त्यावर फिरू न देण्याचा इशारा

जन सम्राट टाईम्स

**धुळे । प्रतिनिधी:** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांच्या सुरू असलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी धुळ्यात सकल मराठा समाज आक्रमक झाला आहे. नकाणे तलाव परिसरात मराठा समाजाच्या वतीने जलसमाधी आंदोलनाचा प्रयत्न करण्यात आला. मात्र, खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी आंदोलकांना वेळीच रोखून ताब्यात घेतले. यावेळी आंदोलकांनी शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत आरक्षणाच्या मागणीसाठी आपला आक्रमक पवित्रा स्पष्ट केला. शासनाने मागण्या मान्य न केल्यास मंत्र्यांसह आमदार आणि



खासदारांना रस्त्यावर फिरू देणार नाही, असा इशारा सकल मराठा समाजाच्या पदाधिकाऱ्यांनी दिला.

जरांगेंच्या उपोषणाला धुळ्यातून पाठिंबा जालना जिल्ह्यातील अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील गेल्या सहा दिवसांपासून विविध मागण्यांसाठी उपोषण करत असल्याचे आंदोलकांनी सांगितले. कुणबी नोंदी असलेल्या व्यक्तींना जात प्रमाणपत्राचे वाटप तसेच हैदराबाद आणि सातारा गॅझेट तातडीने लागू करण्याच्या मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू असल्याचे त्यांनी नमूद केले. उपोषणामुळे जरांगे पाटील यांची प्रकृती खालावत असल्याच्या पार्श्वभूमीवर राज्यातील मराठा समाजात असंतोष वाढत असल्याचे चित्र आहे.

त्याचाच भाग म्हणून धुळ्यातही सकल मराठा समाजाने आंदोलनाचे आयोजन केले. मात्र, खबरदारीचा उपाय म्हणून पोलिसांनी आंदोलकांना वेळीच रोखून ताब्यात घेतले. यावेळी आंदोलकांनी शासनाच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करत आरक्षणाच्या मागणीसाठी आपला आक्रमक पवित्रा स्पष्ट केला.नकाणे तलावात जलसमाधी आंदोलनाचा प्रयत्न मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी सकल मराठा समाजाच्या वतीने नकाणे तलाव परिसरात जलसमाधी आंदोलन करण्यात आले. आंदोलक तलावात उतरण्याचा प्रयत्न करत असताना पोलिसांनी खबरदारी घेत त्यांना वेळीच रोखले. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलीस प्रशासनाकडून आवश्यक बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. पोलिसांनी आंदोलकांना ताब्यात घेतल्यानंतर परिस्थिती नियंत्रणात आली. शासनाला आंदोलन तीव्र करण्याचा इशारा मराठा समाजाच्या मागण्यांवर शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल, असा इशारा यावेळी देण्यात आला. मागण्या मान्य न झाल्यास मंत्री, आमदार आणि खासदारांना रस्त्यावर फिरू न देण्याची भूमिका आंदोलकांनी मांडली. मोठ्या संख्येने मराठा बांधव सहभागी या आंदोलनात निंबा मराठे, दीपक रौंदळ, भैय्या शिंदे, संदीप पाटोळे, वीरेंद्र मोरे, राजेंद्र काळे, पप्पू माने, रवींद्र शिंदे, दिनेश चव्हाण, श्रीरंग जाधव, विकास बाबर, तुकाराम बागुल, सुरेश पवार, विक्रम काळे, राकेश भोसले, सुनील पाटील, संतोष लकडे, वैभव पाटील, भूषण बागुल यांच्यासह मराठा समाजाचे बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

## बेपत्ता व्यक्तीचा मृतदेह मक्याच्या शेतात कुजलेल्या अवस्थेत आढळला

जन सम्राट टाईम्स

**सोयगाव | प्रतिनिधी :** सोयगाव तालुक्यातील बहुळखेडा येथील रहिवासी दगडू बिरहान तडवी (वय ५०) हे गेल्या पाच दिवसांपासून बेपत्ता होते. त्यांचा मृतदेह गुरुवारी सकाळी सुमारे ७ वाजता बहुळखेडा परिसरातील मक्याच्या शेतात कुजलेल्या अवस्थेत आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. शेत परिसरातून दुर्गंधी येत असल्याने काही स्थानिक नागरिकांनी तेथे जाऊन पाहणी केली असता मृतदेह आढळून आला. यानंतर तात्काळ सोयगाव पोलिसांना घटनेची माहिती देण्यात आली. घटनास्थळावरून विद्युत तारांचे सापळे जप्त घटनेची माहिती मिळताच सोयगाव पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली. यावेळी वन्यप्राण्यांपासून शेतीचे संरक्षण करण्यासाठी शेताच्या बांधावर लावण्यात आलेले विद्युत तारांचे धोकादायक सापळे पोलिसांनी जप्त केले.



या विद्युत सापळ्याच्या संपर्कात आल्याने दगडू तडवी यांचा मृत्यू झाला असावा, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. मात्र, मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार आहे. पोलिसांनी मृतदेह शवविच्छेदनासाठी सोयगाव ग्रामीण रुग्णालयात पाठविला आहे. दरम्यान, शेतीच्या संरक्षणासाठी बेकायदेशीरपणे विद्युत तार लावल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या घटनेचा पुढील तपास सोयगाव पोलिस ठाणे करीत आहे.

# एका व्यक्तीचा बळी गेल्यानंतरच प्रशासनाला जाग?

## अन्न व औषध प्रशासनाची एका हॉटेलवर तात्पुरती कारवाई

जन सम्राट टाईम्स

**मलकापूर । प्रतिनिधी:** शहरातील एका हॉटेलमध्ये घडलेल्या गंभीर घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने संबंधित हॉटेलवर तात्पुरती बंदची कारवाई केली आहे. प्रशासनाची ही कारवाई स्वागतार्ह असली, तरी एका हॉटेलवर कारवाई करून प्रशासनाची जबाबदारी संपली का? असा संतप्त सवाल आता मलकापूरकरांकडून उपस्थित केला जात आहे. दुर्दैवी घटनेनंतर प्रशासनाने संबंधित आस्थापनावर कारवाई केली. मात्र, शहरातील इतर हॉटेल्स, खानावळी, खाद्यपदार्थ विक्री केंद्रे आणि संबंधित आस्थापनांमध्ये अन्न सुरक्षा, स्वच्छता आणि आरोग्यविषयक नियमांचे पालन केले जात आहे की नाही, याची व्यापक तपासणी झाली आहे का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे. नियमित तपासणीचा अभाव? हॉटेल्स व खाद्यपदार्थ विक्री केंद्रांमध्ये अन्नपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता, अन्नसाठवणुकीची पद्धत, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, स्वयंपाकगृहाची स्वच्छता तसेच मुदतबाह्य किंवा निकृष्ट पदार्थांचा वापर होत नाही ना, याची नियमित तपासणी होणे आवश्यक आहे. मात्र एखादी गंभीर घटना घडल्यानंतरच प्रशासनाकडून तपासणी आणि कारवाईला वेग येत असेल, तर ही बाब चिंताजनक असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. प्रतिबंधात्मक तपासणी ही दुर्घटनेनंतरच्या कारवाईपेक्षा अधिक महत्त्वाची आहे, असेही नागरिकांचे म्हणणे आहे. 'सर्व हॉटेल्सची तपासणी करा' एका आस्थापनावर कारवाई करण्यापुरते प्रशासनाचे अभियान मर्यादित न ठेवता मलकापूर शहरातील सर्व हॉटेल्स, खानावळी आणि खाद्यपदार्थ विक्री केंद्रांची विशेष तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तपासणीदरम्यान नियमांचे उल्लंघन




आढळल्यास संबंधित आस्थापनांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी. तसेच प्रशासनाने केलेल्या तपासणीचा अहवाल जनतेसमोर जाहीर करावा, अशीही मागणी नागरिकांनी केली आहे. पुढील दुर्घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक कारवाई कधी? एका व्यक्तीचा जीव गेल्यानंतरच प्रशासनाला जाग येणार असेल, तर पुढील दुर्घटना टाळण्यासाठी प्रतिबंधात्मक तपासणी कधी होणार? हा प्रश्न सध्या मलकापूरकरांसमोर उभा आहे. संबंधित हॉटेलवर तात्पुरती कारवाई केल्यानंतर आता अन्न व औषध प्रशासन शहरातील इतर हॉटेल्सवरही त्याच गांभीर्याने कारवाई करणार का, की ही मोहीम केवळ एका घटनेपुरतीच मर्यादित राहणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये प्रशासनाने केवळ घटना घडल्यानंतर प्रतिक्रिया देण्याऐवजी नियमित आणि प्रभावी तपासणी व्यवस्था राबवावी, अशी अपेक्षा मलकापूरकरांकडून व्यक्त होत आहे. शहरातील एका हॉटेलमध्ये घडलेल्या गंभीर घटनेत एका व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाने संबंधित हॉटेलवर तात्पुरती बंदची कारवाई केली आहे. प्रशासनाची ही कारवाई स्वागतार्ह असली, तरी एका हॉटेलवर कारवाई करून प्रशासनाची जबाबदारी संपली का? असा संतप्त सवाल आता मलकापूरकरांकडून उपस्थित केला जात आहे. दुर्दैवी घटनेनंतर प्रशासनाने संबंधित आस्थापनावर कारवाई केली. मात्र, शहरातील इतर हॉटेल्स, खानावळी, खाद्यपदार्थ विक्री केंद्रे आणि संबंधित आस्थापनांमध्ये अन्न सुरक्षा, स्वच्छता आणि आरोग्यविषयक नियमांचे पालन केले जात आहे की नाही, याची व्यापक तपासणी झाली आहे का, असा प्रश्न नागरिकांकडून उपस्थित होत आहे. नियमित तपासणीचा अभाव? हॉटेल्स व खाद्यपदार्थ विक्री केंद्रांमध्ये अन्नपदार्थांची गुणवत्ता, स्वच्छता, अन्नसाठवणुकीची पद्धत, पिण्याच्या पाण्याची गुणवत्ता, स्वयंपाकगृहाची स्वच्छता तसेच मुदतबाह्य किंवा निकृष्ट पदार्थांचा वापर होत नाही ना, याची नियमित तपासणी होणे आवश्यक आहे. मात्र एखादी गंभीर घटना घडल्यानंतरच प्रशासनाकडून तपासणी आणि कारवाईला वेग येत असेल, तर ही बाब चिंताजनक असल्याची भावना नागरिक व्यक्त करीत आहेत. प्रतिबंधात्मक तपासणी ही दुर्घटनेनंतरच्या कारवाईपेक्षा अधिक महत्त्वाची आहे, असेही नागरिकांचे म्हणणे आहे. 'सर्व हॉटेल्सची तपासणी करा' एका आस्थापनावर कारवाई करण्यापुरते प्रशासनाचे अभियान मर्यादित न ठेवता मलकापूर शहरातील सर्व हॉटेल्स, खानावळी आणि खाद्यपदार्थ विक्री केंद्रांची विशेष तपासणी मोहीम राबवावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तपासणीदरम्यान नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित आस्थापनांवर नियमानुसार कठोर कारवाई करावी. तसेच प्रशासनाने केलेल्या तपासणीचा अहवाल जनतेसमोर जाहीर करावा, अशीही मागणी नागरिकांनी केली आहे.

# नगरपरिषदेतर्फे बैलपोळ्यानिमित्त 'उत्कृष्ट बैलजोडी स्पर्धे'चे आयोजन

जन सम्राट टाईम्स

नशिराबाद (ता. जळगाव) : शेतकऱ्यांच्या कष्टाचा खरा साथीदार असलेल्या बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यासोबतच महाराष्ट्राच्या समृद्ध शेतीप्रधान संस्कृती व परंपरेचे जतन करण्याच्या उद्देशाने नशिराबाद नगरपरिषदेच्या वतीने बैलपोळा सणानिमित्त 'उत्कृष्ट बैलजोडी स्पर्धे'चे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा गुरुवार, १० सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ९ वाजता खालची आळी, विठ्ठल मंदिर, नशिराबाद येथे होणार आहे. विजेत्यांना रोख बक्षिसांसह चषक स्पर्धेतील उत्कृष्ट बैलजोड्यांना आकर्षक रोख बक्षिसे व चषक प्रदान करण्यात येणार आहेत. नशिराबादमधील बैलमालकांनाच सहभागाची संधी या स्पर्धेत केवळ नशिराबाद गावातील रहिवाशांनाच सहभागी होता येणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी नशिराबाद नगरपरिषदेमध्ये नोंदणी करणे आवश्यक आहे. स्पर्धेची अधिक माहिती व नोंदणीसाठी ९३५९८१७२१२ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. बैलपोळा हा शेतकरी आणि बैल यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते अधोरेखित करणारा पारंपरिक सण आहे. या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेमुळे बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याबरोबरच ग्रामीण संस्कृती आणि पारंपरिक मूल्यांचे जतन करण्यासही हातभार लागणार आहे. 'आपली परंपरा... आपला अभिमान... आपल्या बैलांचा सन्मान!' या भावनेतून नशिराबाद शहरातील जास्तीत जास्त शेतकरी बांधवांनी व बैलमालकांनी या स्पर्धेत उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे, असे आवाहन नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले आहे. नशिराबाद नगरपरिषदेचे नगराध्यक्ष श्री. योगेश पाटील, उपनगराध्यक्ष श्री. पंकज महाजन, मुख्याधिकारी श्री. रविंद्र सोनवणे तसेच सर्व सन्माननीय सभापती, नगरसेवक व नगरसेविका यांच्या पुढाकाराने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

जन सम्राट टाईम्स सत्याचे प्राईम्स ब्रेक न्यूज ज

# धुळ्यात रंगणार उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठी दहीहंडी!



जन सम्राट टाईम्स

**धुळे | प्रतिनिधी :** धुळे शहरात शनिवारी उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. फाईट ग्रुपच्या वतीने सामाजिक कार्यकर्ते नाना साळवे यांच्या पुढाकारातून पारोळा रोड परिसरातील प्रकाश टॉकीज चौकात शनिवार, दि. ५ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ वाजता या भव्य दहीहंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या दहीहंडी उत्सवाचे उद्घाटन जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांच्या हस्ते होणार असून, आमदारांसह विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांची उपस्थिती राहणार आहे. त्यामुळे धुळे शहरात या उत्सवाची उत्सुकता निर्माण झाली आहे. दहीहंडीतून सर्वधर्मसमभावाचा संदेश धुळे शहरात प्रथमच एवढ्या मोठ्या स्वरूपात दहीहंडीचे आयोजन करण्यात येत असून, या उपक्रमाच्या माध्यमातून सामाजिक कार्यकर्ते नाना साळवे यांनी सर्वधर्मसमभाव आणि सामाजिक एकतेचा संदेश देण्याचा प्रयत्न केला आहे. सर्व समाजघटकांनी एकत्र येऊन उत्सव साजरा करावा, सामाजिक सलोखा आणि बंधुभाव वाढावा, या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याचे फाईट ग्रुपच्या वतीने सांगण्यात आले. भव्य आयोजनाची जय्यत तयारी उत्तर महाराष्ट्रातील सर्वात मोठ्या दहीहंडी उत्सवासाठी फाईट ग्रुपच्या वतीने जय्यत तयारी करण्यात आली आहे. दहीहंडी फोडणाऱ्या गोविंदा पथकांसाठी तसेच सहभागी होणाऱ्यांसाठी आकर्षक बक्षिसांची घोषणा करण्यात आली आहे. कार्यक्रमाला मोठी गर्दी अपेक्षित असल्याने आयोजनस्थळी आवश्यक त्या तयारीवर भर देण्यात आला आहे. राजकीय, सामाजिक आणि प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती या भव्य दहीहंडी सोहळ्यास पालकमंत्र्यांसह आमदार, खासदार, महापौर, पोलीस दलातील अधिकारी, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. या पार्श्वभूमीवर धुळे शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून दहीहंडी उत्सवाचा आनंद घ्यावा, असे आवाहन फाईट ग्रुपच्या वतीने करण्यात आले आहे. फाईट ग्रुपच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती यावेळी फाईट ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष नाना साळवे, विजय अहिरे, पप्पू पगारे, मनोज पारेराव, गोविंदा गरुड, सुमित शिंदे, लड्डू शिंदे, विनय अहिरे, राहुल साळवे, अमोल झालर, योगेश पाटील यांच्यासह फाईट ग्रुपचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जळगावात अवैध वेश्या व्यवसायावर पोलिसांचा छापा; चार महिलांची सुटका

जन सम्राट टाईम्स

**जळगाव। प्रतिनिधी:** शहरातील पिंप्राळा परिसरात सुरू असलेल्या अवैध वेश्या व्यवसायाचा रामानंदनगर पोलिसांनी डमी ग्राहकाच्या मदतीने पर्दाफाश केला. कुंभारवाड्याजवळील एका बंगल्यावर पोलिसांनी नियोजनबद्ध पद्धतीने छापा टाकून चार पीडित महिलांची सुटका केली. या कारवाईत तीन ग्राहक आणि एक पंटरही पोलिसांच्या हाती लागला असून, या प्रकरणात एका महिलेसह दोन पुरुषांचा मुख्य सहभाग असल्याचे तपासात समोर आले आहे. पोलिसांच्या या धडक कारवाईमुळे परिसरात खळबळ उडाली आहे.

पिंप्राळा परिसरातील एका बंगल्यात अवैध वेश्या व्यवसाय सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. माहितीची खातरजमा करण्यासाठी पोलिसांनी सापळा रचण्याचे नियोजन केले. त्यानुसार एका पोलिस कर्मचाऱ्याला डमी ग्राहक म्हणून संबंधित बंगल्यावर पाठविण्यात आले. बंगल्यात अनैतिक व्यवसाय सुरू असल्याची खात्री झाल्यानंतर डमी ग्राहकाने पोलिसांना ठरल्याप्रमाणे मिस्ड कॉल करून कारवाईसाठी संकेत दिला. संकेत मिळताच परिसरात दबा धरून बसलेल्या पोलिसांच्या पथकाने



तातडीने बंगल्यावर धाड टाकली. अचानक झालेल्या या कारवाईमुळे तेथे उपस्थित असलेल्या व्यक्तींमध्ये एकच धावपळ उडाली. पोलिसांनी घटनास्थळाची झडती घेतली असता चार पीडित महिला, तीन ग्राहक आणि एक पंटर आढळून आला.

### चार महिलांची सुटका

कारवाईदरम्यान पोलिसांनी चार महिलांची सुटका केली. या महिलांना संबंधित व्यवसायात ढकलण्यात आले होते का, त्यांची फसवणूक किंवा जबरदस्ती करण्यात आली होती का, याबाबत पोलिसांकडून पुढील तपास करण्यात येत आहे. महिलांच्या जबाबातून या रॅकेटची अधिक माहिती समोर येण्याची शक्यता आहे. प्राथमिक तपासात या अवैध व्यवसायाच्या व्यवस्थापनात एका महिलेचा आणि दोन पुरुषांचा सहभाग असल्याचे समोर आले आहे. तसेच घटनास्थळी आढळून आलेल्या ग्राहकांचीही चौकशी करण्यात येत आहे. पोलिसांनी संबंधितांविरुद्ध कायदेशीर कारवाई सुरू केली असून, या रॅकेटमागे आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास सुरू आहे.

### वरिष्ठांच्या मार्गदर्शनाखाली धडक कारवाई

ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. डीवायएसपी प्रोबेशनरी सह्याद्री बिर्ले, रामानंदनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मधुकर साळवे तसेच AHTUच्या API माधुरी बोरसे यांच्या नेतृत्वाखाली पोलिसांच्या पथकाने ही कारवाई केली. कारवाईत PSI दिनेश बडगुजर, हेड कॉन्स्टेबल अमित माळी, संघपाल तायडे, PSI राजेश पाटील, ASI अनिल पाटील, ASI भूषण कोल्हे, पोलीस हवालदार दीपक पाटील, किरण धनगर, मनीषा पाटील, महिला पोलीस कॉन्स्टेबल राखी खाटिक यांच्यासह अन्य पोलिस कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला.

# रावेर तालुक्यात भूकंपाचे धक्के

## ३.३ रिश्टर स्केलच्या धक्क्याने पहाटे नागरिकांची धावपळ

जन सम्राट टाईम्स

**रावेर। (प्रतिनिधी):** तालुक्यातील सातपुडा पर्वतरांगांमधील मोहगण परिसरात मंगळवारी पहाटेच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता ३.३ रिश्टर स्केल इतकी नोंदवली गेली. पहाटेच्या शांत वातावरणात अचानक जमीन हादरल्याने परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. अचानक जाणवला जमिनीचा हादरा पहाटेच्या सुमारास अचानक जमिनीला हादरा बसल्याने गाढ झोपेत असलेले नागरिक जागे झाले. काही नागरिकांनी घाबरून घराबाहेर धाव घेतली. सातपुडा पायथ्याशी असलेल्या मोहगण परिसरासह रावेर तालुक्यातील काही भागात या भूकंपाच्या धक्क्याची जाणीव झाल्याची माहिती आहे. सुदैवाने कोणतीही हानी नाही भूकंपाची तीव्रता कमी असल्याने कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही. तसेच घरांना किंवा इतर मालमत्तेला मोठे नुकसान झाल्याची माहिती समोर आलेली नाही. घटनेनंतर प्रशासन आणि आपत्कालीन



यंत्रणा सतर्क झाली असून परिस्थितीवर लक्ष ठेवले जात आहे. प्रशासनाकडून सतर्कतेचे आवाहन भूकंपाच्या धक्क्यांनंतर नागरिकांनी घाबरून न जाता सावध आणि सतर्क राहावे, असे आवाहन तालुका प्रशासन व आपत्कालीन व्यवस्थापन यंत्रणेकडून करण्यात आले आहे. परिसरातील परिस्थितीवर प्रशासनाकडून लक्ष ठेवण्यात येत आहे. भूकंपाचा संक्षिप्त तपशील ठिकाण : मोहगण परिसर, सातपुडा पर्वतरांग, रावेर तालुका, जि. जळगाव तीव्रता : ३.३ रिश्टर स्केल वेळ : मंगळवारी पहाटे परिणाम : कोणतीही जीवित किंवा वित्तहानी नाहीतालुक्यातील सातपुडा पर्वतरांगांमधील मोहगण परिसरात मंगळवारी पहाटेच्या सुमारास भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले. या भूकंपाची तीव्रता ३.३ रिश्टर स्केल इतकी नोंदवली गेली. पहाटेच्या शांत वातावरणात अचानक जमीन हादरल्याने परिसरातील नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले. अचानक जाणवला जमिनीचा हादरा पहाटेच्या सुमारास अचानक जमिनीला हादरा बसल्याने गाढ झोपेत असलेले नागरिक जागे झाले. काही नागरिकांनी घाबरून घराबाहेर धाव घेतली. सातपुडा पायथ्याशी असलेल्या मोहगण परिसरासह रावेर तालुक्यातील काही भागात या भूकंपाच्या धक्क्याची जाणीव झाल्याची माहिती आहे. सुदैवाने कोणतीही हानी नाही भूकंपाची तीव्रता कमी असल्याने कोणतीही जीवित अथवा वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही.

# झोक्यात झोपलेल्या बालकाचा गळफास लागून दुर्दैवी मृत्यू

जन सम्राट टाईम्स

पाचोरा। प्रतिनिधी: शहरातील कृष्णापुरी परिसरातील सारोळा रोड भागात झोक्यात झोपलेल्या अवघ्या एक वर्षाच्या बालकाचा गळफास लागून दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना सोमवारी सकाळी घडली. संघर्ष राहुल पाटील असे मयत चिमुकल्याचे नाव आहे. तो सैनिक राहुल बाप्पुराव पाटील यांचा मुलगा होता. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी सकाळी संघर्ष याला नेहमीप्रमाणे घरातील झोक्यात झोपविण्यात आले होते. तो डोक्यातून खाली घरंगळून पडू नये म्हणून त्याच्या पोटाला झोक्यावर आवरण बांधण्यात आले होते. मात्र, झोक्याच्या पायथ्याकडे सरकत असताना पोटाला बांधलेले आवरण त्याच्या गळ्याजवळ आले आणि त्याला गळफास बसला. काही वेळाने आईने झोक्याकडे पाहिले असता हा प्रकार तिच्या लक्षात आला. त्यानंतर नातेवाईकांनी तातडीने संघर्षला पाचोरा ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र,



वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणी करून त्याला मृत घोषित केले. चिमुकल्याच्या मृत्यूची बातमी समजताच आईसह नातेवाईकांनी ग्रामीण रुग्णालयात एकच हंबरडा फोडला.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. विशेष म्हणजे, रविवारीच संघर्षचा पहिला वाढदिवस साजरा करण्यात आला होता, अशी माहिती मिळाली. पहिला वाढदिवस साजरा झाल्यानंतर अवघ्या एका दिवसातच चिमुकल्याचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने पाटील कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# राजाभाऊ सावळे पिपल्स रिपब्लिकन पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी



जन सम्राट टाईम्स

**मलकापूर| प्रतिनिधी :** पिपल्स रिपब्लिकन पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी राजाभाऊ सावळे यांची बहुमताने निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी काळात जिल्ह्यातील पक्ष संघटनेला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. संघटन मजबूत करण्यास प्राधान्य राजाभाऊ सावळे हे पक्षाच्या माध्यमातून सामाजिक आणि जनहिताच्या विविध प्रश्नांवर सातत्याने भूमिका मांडत आले आहेत. जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी पुन्हा मिळाल्यानंतर जिल्ह्यात पक्षाची संघटनात्मक ताकद वाढविणे, नव्या कार्यकर्त्यांना पक्षाशी जोडणे आणि तळागाळातील संघटन अधिक मजबूत करणे, यावर त्यांचा भर राहण्याची अपेक्षा आहे. सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणार? सामाजिक न्याय, वंचित घटकांचे प्रश्न तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या मूलभूत समस्या याबाबत पक्षाची भूमिका अधिक आक्रमकपणे मांडण्याचे आव्हान आता राजाभाऊ सावळे यांच्यासमोर आहे. जनतेच्या प्रश्नांवर आंदोलनात्मक भूमिका घेत पक्षाचा जनाधार वाढविण्याची संधीही त्यांच्या नेतृत्वासमोर आहे. कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण राजाभाऊ सावळे यांच्या निवडीचे पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून स्वागत करण्यात येत आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली पिपल्स रिपब्लिकन पक्षाला जिल्ह्यात नवी उभारी मिळेल, असा विश्वास कार्यकर्त्यांकडून व्यक्त केला जात आहे. राजकीय वर्तुळाचे लक्ष जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर पक्ष संघटन विस्तारासोबतच सामाजिक न्याय आणि वंचित घटकांच्या प्रश्नांवर राजाभाऊ सावळे कोणती भूमिका घेतात, याकडे आता राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. राजकीय सक्रियता वाढणार का, याबाबतही उत्सुकता निर्माण झाली आहे. पिपल्स रिपब्लिकन पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदी राजाभाऊ सावळे यांची बहुमताने निवड करण्यात आली आहे. त्यांच्या निवडीमुळे पक्षाच्या निष्ठावंत कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, आगामी काळात जिल्ह्यातील पक्ष संघटनेला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. संघटन मजबूत करण्यास प्राधान्य राजाभाऊ सावळे हे पक्षाच्या माध्यमातून सामाजिक आणि जनहिताच्या विविध प्रश्नांवर सातत्याने भूमिका मांडत आले.

# नोटरी अनिवार्य नसल्याचे तहसीलदारांचे स्पष्ट; नागरिकांमधील गैरसमज दूर

## भाजप कार्यकर्त्यांच्या निवेदनानंतर तहसीलदार उल्हास देवरे यांचे स्पष्टीकरण

जन सम्राट टाईम्स

**पारोळा। प्रतिनिधी:** विविध शासकीय कामांसाठी नोटरी करणे अनिवार्य करण्यात आल्याच्या चर्चेमुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम अखेर दूर झाला आहे. नोटरी अनिवार्य करण्याबाबत कोणतेही आदेश काढण्यात आलेले नाहीत, असे स्पष्ट स्पष्टीकरण पारोळ्याचे तहसीलदार उल्हास देवरे यांनी दिले. याबाबत नागरिकांमध्ये सुरू असलेला संभ्रम दूर करण्यासाठी भारतीय जनता पक्षाच्या कार्यकर्त्यांनी तहसीलदारांची भेट घेऊन निवेदन सादर केले. ज्या शासकीय कामांसाठी नोटरीची आवश्यकता नाही,



अशा कामांसाठी नागरिकांना अनावश्यकपणे नोटरी करण्यास भाग पाडू नये, अशी मागणी यावेळी करण्यात आली. नोटरीच्या खर्चाचा नागरिकांवर अनावश्यक भार नोटरी करण्यासाठी लागणारा खर्च सर्वसामान्य नागरिकांना परवडणारा नसल्याने, ज्या कागदपत्रांसाठी नोटरीची आवश्यकता नाही त्यासाठी नोटरी बंधनकारक केल्यास नागरिकांवर अनावश्यक आर्थिक भार पडू शकतो, अशी बाब भाजप कार्यकर्त्यांनी तहसीलदारांच्या निदर्शनास आणून दिली. तहसीलदारांचे स्पष्ट स्पष्टीकरण यावेळी तहसीलदार उल्हास देवरे यांनी सांगितले की, नोटरी अनिवार्य करण्याबाबत शासन किंवा प्रशासनाकडून कोणत्याही प्रकारचे आदेश काढण्यात आलेले नाहीत. त्यामुळे नागरिकांनी याबाबत गैरसमज करून घेऊ नये. शासकीय कामकाज आवश्यक कागदपत्रे आणि प्रचलित पेपरवर्कच्या आधारे पूर्वीप्रमाणेच सुरू राहणार आहे. तसेच स्वयंघोषणापत्रासारख्या कागदपत्रांच्या बाबतीत आवश्यकतेनुसार रु. २०/- चे तिकिट किंवा रु. १००/- स्टॅम्प पेपरवर कागदपत्र करता येत असल्याचेही तहसीलदारांनी स्पष्ट केले. अशा बाबतीत अनावश्यकपणे नोटरी करण्याची आवश्यकता नसल्याचे त्यांनी सांगितले. अफवांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहन तहसीलदारांच्या या स्पष्टीकरणामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेला संभ्रम दूर झाला असून, अनावश्यक नोटरीचा खर्च करण्याची गरज नसल्याने सर्वसामान्य नागरिकांना दिलासा मिळाला आहे. नागरिकांनी कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता संबंधित शासकीय कार्यालयाकडून अधिकृत माहिती घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. सर्वसामान्य नागरिकांचा वेळ आणि पैसा वाचावा तसेच शासकीय कामकाज अधिक सुलभ व्हावे, यासाठी भाजप कार्यकर्त्यांनी केलेल्या पाठपुराव्याला प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला. भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित यावेळी भाजप न.पा. उपनगराध्यक्ष रोहन मोरे, नगरसेवक अमोल शिरोळे, भाजपा पारोळा तालुकाध्यक्ष अतुलअण्णा पवार, शहराध्यक्ष मुकुंदा चौधरी, जिल्हा चिटणीस रवींद्र पाटील, सरचिटणीस विनोद पाटील, राजेंद्र चौधरी यांच्यासह भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.